NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
Year: 20 1ST FEBRUARY 1995 No. 1

## अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका

# नुटाच्या टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा जाहीरनामा

*

-लेखन-

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य.
अध्यक्ष "नुटा'

**सिनेटमध्ये "नुटा" ने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे पॅनेल.**

# पदवीधर व शिक्षक मतदारांना विनंती

अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी १९९५ रोजी होऊ घातल्या आहेत. शिक्षक मतदार संघातील २० जागांसाठी नुटाने आपले उमेदवार अधिकृतपणे उभे केले असून पदवीधर मतदार संघाच्या १० जागासाठी होणाऱ्या निवडणुकांमध्ये काही उमेदवारांना पाठिंबा दिला आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघातून अमरावती विद्यापीठाच्या सिनेटवर निवडून द्यावयाच्या या जागांसाठी होणाऱ्या मतदानामध्ये या पत्रकात नमूद केलेल्या उमेदवारांना, सूचित केल्याप्रमाणे पसंतीचे क्रमांक देऊन निवडून द्यावे अशी सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांना विनंती आहे.

**आपले नम्र**
**प्रा.बी.टी.देशमुख**
अध्यक्ष "नुटा'

**प्रा.आर.चित्तरंजन** **प्रा. एकनाथ कठाळे** **प्रा.डी.डी.सोमाणी**
**प्रा.एस.ए.तिवारी** **प्रा.एस.व्ही.आंबेकर** **प्रा.एस.बी.चिंचमलातपुरे**
**प्रा.एस.टी.सांगळे** **प्रा.एस.के.कळणावत** **प्रा.बी.एस.देशमुख** **प्रा. एस.एन.दिवेकर** **प्रा.बी.पी.ढोरे**

## मतदानाची पद्धती कशी आहे?

### (A) पदवीधरांसाठी

१. पदवीधरांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ ९ हजार पदवीधर १० प्रतिनिधी निवडणार आहेत.

२. यापैकी तीन जागा राखीव आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीतून (S.C.) एक, अनुसूचित जमातीतून (S.T.) एक व इतर मागासवर्गीय जातीतून (O.B.C.) एक उमेदवार निवडावयाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक पदवीधर मतदारास खुल्या जागासाठी एक, अनुसूचित जातीची एक, अनुसूचित जमातीकरिता एक व इतर मागासवर्गीय जातीकरिता एक अशा एकूण ४ मतदान पत्रिका मिळतील.

### (B) शिक्षकांसाठी :

३. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्राम्य मतदान पद्धतीनुसार जवळ जवळ २२०० प्राध्यापक १० फॅकल्टीज् मधून २० प्रतिनिधी निवडणार आहेत. मतदान बिनचूकपणे होण्यास या मतदान पद्धतीविषयी देण्यात आलेली पुढील माहिती आपल्याला उपयुक्त ठरेल.

४. प्रत्येक शिक्षक मतदाराला एका फॅकल्टीची एक अशा एकूण ९ मतपत्रिका मिळतील.

५. प्रत्येक मतपत्रिकेवर त्या फॅकल्टीतून उभे असलेल्या सर्व उमेदवारांची नावे राहतील व त्या उमेदवारांच्या नावासमोर आपण पसंतीचे १, २, ३, ४ असे क्रमांक आकड्यात लिहावयाचे आहेत. जितक्या उमेदवारांच्या नावांसमोर क्रमांक लिहिण्याची आपली इच्छा असेल तेवढ्यांच्या नावासमोर आपण क्रमांक लिहू शकता.

६. उदा. शिक्षक मतदार संघातील एका मतदाराला आर्टस फॅकल्टीची मतपत्रिका मिळेल. त्या मतपत्रिकेवर जर एकूण १३ उमेदवारांची नावे असतील तर त्यामध्ये समजा पॅनेलचे ४ उमेदवार आहेत. त्यांना आपण आपल्या पसंतीप्रमाणे १, २, ३, ४ पसंतीचे क्रमांक द्या. मग त्याच मतदाराला 'सोशल सायंसेस' ची मतपत्रिका मिळेल. त्या मतपत्रिकेवर 'पॅनेल' चे जर चार उमेदवार असतील तर तेथे आपण १, २, ३, ४ असे त्या चौघांच्या नावासमोर आपल्या पसंतीचे क्रमांक लिहा.

### (C) सर्वसामान्य सूचना व विनंती :

७. प्रत्येक मतपत्रिकेमध्ये 'पॅनेल' चे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्व उमेदवारांना आपण पसंतीचे क्रमांक द्यावे, अशी आमची आपणास विनंती आहे. "मतदान करण्याबाबत आमची विनंती" मध्ये नमूद केल्याप्रमाणे पसंतीक्रम द्यावे.

८. पसंतीचे क्रमांक मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोर नेमून दिलेल्या जागी लिहावयाचे असून ते मराठी, हिंदी, इंग्रजी वा रोमन अंकात लिहावे. अक्षरी मुळीसुद्धा लिहू नये. 'प्रथम', 'व्दितीय' असे लिहू नये. First, Second असे लिहू नये. 1st, 2nd असे सुद्धा लिहू नये. पसंतीचा क्रमांक नोंदतांना तो अंकातच १, २, ३, ४ असा नोंदवावा. आकड्यांना कंसही करू नये.

९. ज्या मतपत्रिकेवर पसंतीचा प्रथम १ क्रमांक अंकात कुणालाच दिला नसेल ती मतपत्रिका रद्द होते हे कृपया लक्षात ठेवा.

१०. पुढील प्रकारच्या मतपत्रिका ह्या वाया जातात हे लक्षात ठेवावे.

A If One preference is given to more than one candidate
B If Two preferences are given to one candidate.
C If Consecutive preferences are not given.

११. मतपत्रिकेवर मतदाराने स्वाक्षरी केली असेल किंवा मत कुणाला दिले आहे हे कळू शकेल अशा खाणा-खुणा किंवा खोड-तोड ज्या मतपत्रिकेवर असेल ती मतपत्रिका रद्द होऊ शकते.

१२. मतदान पत्रिकेवर मतदान करताना काही चूक किंवा खोडतोड झाल्यास मतपत्रिका तशीच मतपेटीत टाकू नये. ती मतपत्रिका मतदान अधिकाऱ्याकडून रद्द (Cancel) करून घेऊन दुसरी मतपत्रिका प्राप्त करून घ्यावी.

## आमची शिफारस

विद्यापीठाच्या पुढच्या पाच वर्षाच्या कारभाराचे भवितव्य आपल्या या मतदानावर ठरणार आहे, तेव्हा आपण घाईगर्दी न करता मतदान करावे. पॅनेलच्या छापील यादीचा कागद आपणाला पुरविला आहे. पसंतीक्रम ठरविण्यास त्यामुळे आपणास मदत होईल. एक एका फॅकल्टीची मतपत्रिका मिळाली की त्या फॅकल्टीतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्यांच्या नावासमोर पसंतीचे क्रमांक आपण टाकावे. (अंकामध्ये, अक्षरात नव्हे)

त्या त्या फॅकल्टीतून पॅनेलचे जेवढे उमेदवार आहेत त्या सर्वांनाच पसंतीचे क्रमांक द्यावेत अशी आपणास विनंती आहे. पॅनेलमध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार (पसंतीच्या कोणत्याही क्रमांकासाठी) पॅनेलचे उमेदवार करणार नाहीत, असे त्यांनी अभिवचित केले आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघामध्ये कोणत्या फॅकल्टीतून कोण कोण उमेदवार आहेत याची यादी व मतदारांनी तेथे कशाप्रकारे मतदान करावे या बाबतची आमची विनंती याच अंकात स्वतंत्रपणे नमूद केली आहे.

## उमेदवारांनी मान्य केलेली निश्चित भूमिका

लोकशाही व्यवस्थेमध्ये त्या त्या संस्थामध्ये काम करणाऱ्या माणसांच्या दर्जावर त्या संस्थांचे भवितव्य अवलंबून असते. उत्तम दर्जाची माणसे विद्यापीठामध्ये विविध पदावर निवडून आली तर त्या माणसांची व त्याबरोबरच त्या पदांची शान वाढते. कमी दर्जाची माणसे निवडून आली तर त्या प्रमाणात त्या त्या पदांचे अवमूल्यन होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक सेवाशर्तीबाबत काम करीत असताना विद्यापीठाच्या या एकंदर व्यवस्थेमध्ये विद्यार्थी हा खरा केंद्रबिंदू राहील ही आमची सिनेटमध्ये काम करतांनाची श्रद्धा असेल. जात, धर्म, राजकीय पक्ष किंवा विद्यापीठातील गटबाजी यांचा विचार व पर्वा न करता सिनेटमध्ये नुटाने स्वीकारलेल्या धोरणाला पाठिंबा देण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधर उमेदवारांचे हे पॅनेल असेल. नुटाच्या ध्येय, धोरण व कार्यक्रमाला पाठिंबा देण्यास या पॅनेलचे सदस्य वचनबद्ध असतील.

पॅनेलमध्ये असलेल्या प्रत्येक उमेदवाराने काही बंधनांचे पालन करावयाचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे. ती बंधने पुढीलप्रमाणे :-

१) प्रत्येक उमेदवार स्वतःसाठी पसंतीच्या प्रथम क्रमांकाचे मत मागण्यास व्यक्तिशः मोकळा असेल.

२) स्वतःच्या वैयक्तिक प्रचाराबरोबर पॅनेलमधील सर्व उमेदवारांना पसंतीचे क्रमांक अवश्य द्या अशा प्रकारचा प्रचार करण्याची प्रत्येकावर जबाबदारी असेल.

३) पॅनेल मध्ये नसलेल्या कोणत्याही उमेदवाराचा प्रचार पॅनेलमधील उमेदवार करणार नाही.

४) पॅनेलवर असलेल्या कोणत्याही उमेदवाराला आपण पसंतीचा पहिला किंवा वरचा क्रमांक देणार आहोत असे मतदाराने सांगितल्यास पॅनेलवरील उमेदवार त्याला दुसरा किंवा पसंतीचा पुढील क्रमांक मागतील.

५) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला फारच कमी मते पडतात, तो पडतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही करणार नाही.

६) पॅनेलवरील अमुक एका उमेदवाराला जास्त मते मिळतात, तो तर येतोच तेव्हा त्याला पसंतीचा प्रथम क्रमांक न देता तो मला द्या असा प्रचार कोणीही उमेदवार करणार नाही.

उपरोक्त सूचनाचा अव्हेर करून जर पॅनेलवरील एखादा उमेदवार प्रचार करीत असेल तर त्या उमेदवाराला मतदारांनी ताबडतोब हटकले पाहिजे अशी विनंती आहे.

## अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका

# नुटाच्या टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलचा जाहीरनामा

### सिनेटच्या निवडणुकांचे महत्त्व

अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी १९९५ रोजी होऊ घातल्या आहेत. आमच्या सहकारी मित्रांना येत्या सिनेट निवडणुकांमध्ये सर्व शिक्षक व पदवीधर मतदारांनी निवडून द्यावे अशी विनंती करण्यासाठी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला असून सदरहू निवडणुकांशी संबंधित प्रश्नांची चर्चा पुढील लहानलहान परिच्छेदातून केलेली आहे.

२. अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. आता या गोष्टीला जवळ जवळ १२ वर्षे पूर्ण होत आलेली आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम २५ मध्ये सिनेटची रचना दिली असून कलम २६ मध्ये सिनेटचे अधिकार व कर्तव्ये नमूद केलेली आहेत. **जुना अस्तित्वात असलेला स्टॅट्युट रद्द करणे, किंवा त्यामध्ये बदल करणे तसेच नवीन स्टॅट्युट तयार करणे हा सिनेटचा अधिकार आहे.**

३. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ५ व्या प्रकरणामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे संलग्न महाविद्यालयातील **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक जीवनाशी संबंधित किती तरी महत्त्वपूर्ण बाबींसाठी सिनेटने प्रस्तावित केलेल्या अथवा व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या परिनियमांना अंतिम स्वरूपात मान्यता देण्याचा अधिकार सिनेटचा आहे.** हे चटकन लक्षात यावे म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ५१ व्या कलमातील संबंधित परिच्छेद जसाचा तसा पुढे देत आहोत :-

51. Subject to the provisions of this Act, the statutes may provide for all or any of the following matters namely :-

(8) Qualifications, recruitment, workload, code of conduct, terms of office, duties and conditions of service, including periodic assessment of teachers, officers and other employees of the university and the affiliated colleges (except those colleges or institutions maintained by the State or Central Government or a local authority) the provision of pension, gratuity and provident fund, the manner of termination of their services, as approved by the State Government ;

(11) the norms for grant of autonomy to university departments or institutions, affiliated colleges and recognised institutions, subject to the approval of the State Government;

(13) Provision of reservation of adequate number of posts of teachers, officers and other employees of the university, affiliated colleges and recognised institutions for members of the Scheduled Castes and Scheduled Tribes and other Backward Classes in accordance with the policy of the State Government;

(14) number of working days, number of actual days of instructions, holidays other than Sundays, vacation and terms in academic year;

(15) disciplinary action against defaulting teachers, officers and other employees of the university, affiliated colleges and recognised institutions other than the colleges or institutions managed and maintained by the State Government or Central Government or Local Authorities;

(16) the taking over or transferring in public interest of the management of a college or instituion by the university and the conditions for such taking over or transferring subject to the approval of the State Government;

४. विद्यापीठ अनुदान आयोगाची नवीन वेतनश्रेणी अंमलात आणण्याविषयीच्या केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या पत्राच्या परिशिष्ट एकमध्ये नमूद केलेल्या अनेक बाबींचे तपशील हे विद्यापीठांनी स्टॅट्युट करून विहित करावयाचे आहेत असे त्या पत्रात स्पष्टपणे म्हटलेले आहे. या परिशिष्टाच्या परिच्छेद २२ मध्ये म्हटल्याप्रमाणे रेग्युलर ॲंड सिस्टिमॅटिक परफॉर्मन्स अप्रेझलसाठीची यंत्रणा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठांनी स्टॅट्युट तयार करून करावयाची आहे. ३०००-५००० तसेच ३७००-५७०० वेतनश्रेण्यामध्ये जाताना स्क्रिनिंग/सिलेक्शन/प्लेसमेंट/प्रमोशन हे स्टॅट्युटनी विहित केलेल्या यंत्रणेचे काम असेल, असे या परिच्छेदामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे. सेवेच्या इतर शर्ती, (Other conditions of service-Probation) सेवा निवृत्ती व सेवा निवृत्तीनंतरची पुनर्नेमणूक, (Superannuation and re-employment) तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal Mechanism) व व्यावसायिक वर्तनसंहिता (code of professional Ethics) ह्या बाबतचे उल्लेख केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या पत्राच्या परिशिष्टामधील परिच्छेद २३,२४,२५,२६ मध्ये नमूद आहेत व यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठानी स्टॅट्युटव्दारे या विहित करावयाच्या बाबी आहेत. **स्टॅट्युट तयार करणे हे कायद्याने सिनेटकडे सोपविलेले काम असल्यामुळे सिनेटच्या निवडणुका व त्यातील शिक्षकांचा सहभाग हा किती महत्त्वाचा आहे ही गोष्ट कोणाच्याही सहजपणे लक्षात येईल.**

५. दिनांक १८.१.१९८९ रोजी (महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाने महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांबरोबर बोलणी केली व) संप मागे घेत असताना उभयपक्षी जे ॲग्रीमेंट झाले त्या ॲग्रीमेंटच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील उल्लेख असलेला स्पष्टपणे दिसून येतो :-

Until the respective Universities have framed as per the guidelines to be issued by the U.G.C., the necessary statutes relating to the procedure (including the composition of the Assessment/Selection Committee) for promotion to the Senior Scale/Selection Grade, the existing Assessment Committee (constituted to assess the performance of a teacher before he is allowed to draw the increment after the stage of Rs. 1,300/- in the existing pay scale of Rs. 700- 1600) including a representative of the D.H.E. wherever not already included, be charged with the inplemenation of the process of selection for promotion to the Sr, Scale as well as Selection Grade."

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणीच्या, महाराष्ट्र प्राध्यापक संघाशी दि. १८.१.१९८९ रोजी झालेल्या करारानुसार, महाराष्ट्र सरकारने दि. २७.२.१९८९ रोजी शासकीय ठराव प्रसृत केला आहे. त्या ठरावामधील परिच्छेद २२ मध्ये महाविद्यालयीन शिक्षकांच्या आठवडी कार्यभाराबाबत तसेच परिच्छेद (२५) मध्ये विद्यापीठीय शिक्षकांच्या आठवडी कार्यभाराबाबत उल्लेख आहेत. परिच्छेद (२५) मध्ये पुढील उल्लेख स्पष्ट

**ग्रामीण भागातील प्राध्यापकांनो आपल्या नवोदित नेतृत्वाची ओळख करून घ्या**

(परिच्छेद १६ ते ४५ पहा)

आहे की, :-

"25 Keeping in view the regulation of the University Grants Commission vide No. F.1-17/83(CP) dated 25th November 1985. and guideline circulated by their letter No. F-1-28/84-(CPP) Vol III dated 18-25th November 1988, the University should prepare a suitable pattern of work load for University Teachers from the academic year 1989-90"

दि. २७.२.१९८९ च्या शासकीय ठरावाच्या परिच्छेद (१२) व (१३) मध्ये प्राध्यापकांची Senior Scale किंवा Selection Grade/ Reader मध्ये पदोन्नती होत असता लागणारी गुणवत्ता सुचविलेली आहे. परिच्छेद (१०), (१४) व (१५) मध्ये सध्या नोकरीत असलेल्या प्राध्यापकांबाबत Senior Scale किंवा Selection Grade/Reader च्या पदोन्नतीसाठीच्या अटी दिल्या असून Regular and Systematic appraisal of Performance साठी लागणारी यंत्रणा परिच्छेद १९ मध्ये दिलेली आहे.

**महाविद्यालयीन किंवा विद्यापीठीय प्राध्यापकांच्या आठवड्याच्या कार्यभाराबाबत तसेच विषयाकरिता किती तासिका असाव्यात, पदोन्नतीकरता** "Regular and systematic apprasial of performance of teachers" **लागणारे नियम व इतरही शिक्षकाच्या जिव्हाळ्याच्या अनेक बाबींसंबधी येत्या एक दोन वर्षात Senate मध्ये महत्त्वाचे निर्णय होऊ घातले आहेत त्याबाबत शिक्षकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.**

७. या ठिकाणी हे नमूद करताना आनंद होतो की टीचर्स पॅनेलवरील जे शिक्षक सिनेटवर व सिनेटमधून तत्कालीन कार्यकारी परिषदेवर निवडून गेले होते त्यांच्या जागरुकपणामुळे प्राध्यापकांच्या वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीतील स्थाननिश्चितीबाबत अतिशय उत्तम निर्णय घेतले गेले व त्यामुळे या स्थाननिश्चितीचे काम इतर विद्यापीठांच्या तुलनेत आपल्या विद्यापीठात अतिशय झपाट्याने व बिनचूक होऊ शकले व याबाबत शिक्षकांना अन्याय निवारणार्थ फारशा तक्रारी करण्याचा प्रसंग आला नाही.

## १९७६ पूर्वीचा कालखंड

८. १९७६ पूर्वीच्या पाचदहा वर्षाचा विद्यापीठाच्या कामाचा अनुभव पाहिला तर विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांनी शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर गळचेपी व ससेहोलपट केलेली आपणांस दिसून येईल. याची कारणमीमांसा करताना असे लक्षात येईल की त्या काळामध्ये सिनेटवर शिक्षकांव्यतिरिक्त इतर वर्गांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आलेले होते.

त्यामानाने शिक्षकांना त्यावेळच्या सिनेटवर अतिशय अल्प जागा देण्यात आल्या होत्या. त्यांचे मतदानसुद्धा विद्याशाखानिहाय होते. सर्व शिक्षकांच्या सुखदु:खाबद्दल जागरूक व तत्पर प्रतिनिधित्व त्यामुळे शिक्षकांच्या वाट्याला येत नसे आणि त्यामुळेच १९७६ पूर्वीच्या कालखंडात संघटित शिक्षक प्रतिनिधित्वाच्या अभावी अनेक शिक्षकविरोधी निर्णय विद्यापीठातून बाहेर पडत असत. त्यातील काही उदाहरणे नुसती नजरेखालून घातली तरी सुद्धा कोणत्या हालअपेष्टांना शिक्षकांना तोंड द्यावे लागत असे हे लक्षात येईल. १९७५ च्या सुमारास **"परिक्षेचे काम केलेच पाहिजे. नाहीतर डिरिकग्नाईज केले जाईल." अशा प्रकारचा हुकूम विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने ठराव करून त्या काळात काढला होता. "ही बाब आमच्या सेवाशर्तीशी संबंधित आहे. स्टॅट्युटनेच ती होऊ शकते, कार्यकारी मंडळाच्या ठरावाने नव्हे" असे वारंवार सांगूनसुद्धा ते ठराववजा आदेश मागे घेण्यास विद्यापीठाला काही वर्षे लागली.** शेवटी शिक्षकांच्या संघटित प्रभावाने ते त्यावेळी मागे घेण्यात आले हा इतिहास फार जुना नसला तरी तो कदाचित शिक्षकांच्या स्मृतीतून उतरला असण्याची शक्यता आहे म्हणून त्याचा पुनरुच्चार केला आहे.

२) १.४.१९६६ पासून ज्या नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या होत्या त्यानुसार प्राध्यापक, उपप्राध्यापक व व्याख्यात्याच्या पात्रतेबाबतच्या अटी ह्या विद्यापीठाने ठरवावयाच्या होत्या. महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठापेक्षा नागपूर विद्यापीठाने ह्या अटी जास्त काटेकोरपणे ठरविल्या होत्या हाही इतिहास जुन्या प्राध्यापकांच्या स्मरणातून गेला नसेल.

३) महाराष्ट्रातील बहुतेक विद्यापीठांनी **प्राध्यापक पदासाठी** सात आठ वर्षाचा **अनुभव** पुरेसा मानला होता तर आमच्या विद्यापीठाने तो पंधरा वर्षाचा ठेवला होता. या निर्दयपणामुळे अन्यथा ज्यांना ७००-११०० वेतनमान त्या वेळेला मिळू शकले असते ते अशा कितीतरी शिक्षकांना मिळू शकले नाही. प्राचार्य होण्यासाठी (१० वर्ष) जेवढा अनुभव पाहिजे त्यापेक्षा जास्त व्यावसायिक अनुभव प्राध्यापक होण्यासाठी (१५ वर्ष) पाहिजे असे म्हणणारे नागपूर विद्यापीठ हे महाराष्ट्रातले त्यावेळचे एकमेव विद्यापीठ होते हे विसरून चालता येणार नाही.

४) उपप्राध्यापकासाठी (४००-८००) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये तीन वर्षाचा अनुभव पुरेसा मानलेला होता तर आमच्या विद्यापीठाने तो पक्का पाच वर्षाचा विहित केला होता.

५) या सर्वावर ताण म्हणजे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात असलेल्या सेवाशर्तीशी तुलना करू जाता 'सेकंडरी स्कूल कोडशी' तुलना करू जाता, **हीन दर्जाचे 'कॉलेज कोड' नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने ७२-७३ च्या दरम्यान मंजूर केले होते व ते त्यावेळच्या कोर्टाच्या (सिनेटच्या) मंजुरीसाठी मांडण्यात आले होते.**

६) या कॉलेज कोडमध्ये असलेल्या घाणेरड्या तरतुदींचा इतका बभ्रा झाला की परिणामी १५०० प्राध्यापकांचा एक मोर्चा दि. २० एप्रिल १९७३ रोजी विद्यापीठावर गेला व ते कॉलेज कोड कार्यकारी मंडळाला मागे घ्यावे लागले.

७) डझनावारी शिक्षकाच्या नेमणुका वर्षानुवर्षे केवळ सत्रकालावधीसाठी केल्या जात असत व सत्रान्ती त्यांची सेवामुक्ती केली जात असे. पण याबाबतीत कोणतीही दखल विद्यापीठ घेत नसे. जणू काही व्यवस्थापकांचा तो जन्मसिद्ध हक्कच आहे असे विद्यापीठाने त्या काळात मान्य करून टाकले होते. "क्लीअर व्हेकन्सी" ची व्याख्या करण्याचे विद्यापीठाने सतत टाळले व त्यामुळे प्रोबेशनवर नेमणूक दिलीच पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्याची विद्यापीठाला त्याकाळात अजिबात गरज वाटत नसे. स्वाभाविकपणे दोन वर्षानंतर कन्फर्म केले पाहिजे असा आग्रह विद्यापीठ धरत नसे. परिणामी स्पष्ट रिक्त पदावरसुद्धा तात्पुरत्या नेमणुका करण्याची फॅशन नागपूर विद्यापीठ क्षेत्रामध्ये वहिवाटीच्या आधारावर रूढ झाली होती व कितीही वर्षाची टेम्पररी सर्व्हिस असलेल्या व्यक्तीला एक महिन्याची नोटीस देऊन काढून टाकता येते हे विद्यापीठानेच अप्रत्यक्षपणे मान्य केले असल्यामुळे त्यात काही दोष आहे असे व्यवस्थापकांना वाटण्याचा प्रश्नच नव्हता.

८) सेवा मुक्ती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या तक्रारीचा निवाडा करण्यासाठी तक्रार निवारण समिती त्या काळामध्ये जरूर होती पण त्या समितीचे निर्णय प्रायः शिक्षकांच्या विरोधात जात असत. हा इतिहास फारसा जुना नाही.

## १९७६ नंतरचा कालखंड

९) सातत्याने शिक्षकांवर होणारा हा जो अन्याय आहे त्याच्या विरोधात संघटितपणे उभे राहिले पाहिजे असा विचार शिक्षक संघटनेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये उभा राहिला. दरम्यान १९७४ चा नागपूर विद्यापीठ कायदा अमलात आलेला होता. शिक्षकांना २५ जागा देण्यात आलेल्या होत्या आणि ह्या २५ जागा सर्व शिक्षकांनी निवडावयाच्या होत्या.

त्यावेळी आम्ही २५ जागांसाठी ३२ उमेदवाराचे एक टीचर्स पॅनेल उभे केले होते. २५ जागापैकी बहुसंख्य जागांवर टीचर्स पॅनेलचे उमेदवार निवडून आले. शिक्षकांच्या प्रश्नावर सिनेटमध्ये नुटाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्यासाठी हे सर्व उमेदवार वचनबद्ध होते. संघटित स्वरुपामध्ये शिक्षकांचा

**"१२ व्या वर्गाचे परीक्षेचे काम ज्येष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना सक्तीचे करता येते- ज्यांनी ते केले नाही त्यांची पगार कपात सुद्धा करता येते...."**

(परिच्छेद १७ ते २७ पहा)

आवाज सिनेटमध्ये पोचल्याचा परिणाम म्हणून कधी नव्हे ते १९७६ मध्ये प्रत्यक्ष शिक्षक संघटनेमध्ये काम करणारा एक शिक्षक विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर सुद्धा निवडून आला. पुढच्या तीन वर्षात १९७९ मध्ये प्रत्यक्ष संघटनेमध्ये काम करणारे असे तीन शिक्षक कार्यकारी मंडळावर निवडून आले.

**शिक्षकांचे हे जे संघटित प्रतिनिधित्व विद्यापीठामध्ये पोचले त्यामुळे १९७६ नंतरच्या ६ वर्षाच्या काळात विद्यापीठाच्या प्राधिकरणाचा शिक्षकाच्या सामायिक हिताच्या विरोधात निर्णय घेण्याच्या कुवतीचा झरा पार आटून गेला हे जाहीरपणे सांगितले पाहिजे.**

१०. शिक्षक विरोधाची विद्यापीठाची धार बोथट झाली इतकेच नव्हे तर प्राचार्य, व्यवस्थापक व शासकीय प्रतिनिधीच्या बरोबर कार्यकारी मंडळ व सिनेटमध्ये बसून आपली बाजू तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्याची संधी शिक्षक प्रतिनिधींना मिळाली व त्यातून कितीतरी शिक्षकहिताचे निर्णय भराभर बाहेर येऊ लागले.

१) सेवामुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी कार्यकारी मंडळाची जी तक्रार निवारण समिती होती तिचे बहुसंख्य निर्णय १९७६ च्या पूर्वी शिक्षकांच्या विरोधात गेलेले (व ते निकाल कार्यकारी मंडळाने मान्य केलेले) आपल्याला दिसून येतील. १९७६ नंतरच्या काळामध्ये मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणामध्ये या समितीकडून शिक्षकांना न्याय मिळू लागला. कायद्यामध्ये न्यायाधिकरणाची तरतूद समाविष्ट होइपर्यंत ही समिती सेवामुक्ती प्रकरणांत काम करीत होती. या काळात असंख्य सेवामुक्त शिक्षकांना पुनःस्थापित करण्यास या समितीचे निर्णय कारणीभूत झाले.

## अतिरिक्त शिक्षकांच्या समस्या

११. १९७६ दरम्यान शिक्षक प्रतिनिधींचा विद्यापीठामध्ये संघटित प्रवेश झाल्यानंतर लगोलग एका अतिशय महत्त्वाच्या संकटमय परिस्थितीला तोंड देण्याची पाळी शिक्षक प्रतिनिधीवर आली. १० + २ + ३ च्या आकृतीबंधामुळे शिक्षक अतिरिक्त ठरणे ही ती समस्या होय.

१२. ७६ च्या सुरुवातीला शासनाने अतिरिक्त शिक्षक ठरविण्यासाठी विद्यापीठाचे काही प्रतिनिधी मुंबईच्या एका वर्कशॉपमध्ये ट्रेनिंग करिता बोलाविले होते. नागपूर विद्यापीठातर्फे प्रा. लांजेवार व प्रा.बी.टी.देशमुख यांना पाठविण्यात आले होते. एका आठवड्याला एका विषयाला किती तास असावेत हे नागपूर विद्यापीठामध्ये १९२३ पासून १९७६ पर्यत कधीही ठरविण्यात आले नव्हते. शिक्षक प्रतिनिधींनी याबाबतचा आग्रह धरला व त्याचा नियम तयार करून घेतला. १९७६ च्या उन्हाळाभर अमरावती येथे सराफ व बी.टी.देशमुख यांच्या कमिटीने व नागपूर येथे दुबे व लांजेवार यांच्या कमिटीने अतिरिक्त शिक्षक काढण्याचे कार्य पुरे केले. कोणाकडून तरी अशी कागाळी केल्या गेली की नागपूर विद्यापीठामध्ये दर विषयाला दर आठवड्याला पुरेपूर तासिका ठरवून घेतल्यामुळे जादा अतिरिक्त शिक्षक विदर्भात निघाले नाहीत.

१३. शासनाने या दोनही कमिटीचे काम कचऱ्याच्या टोपलीत टाकले व नव्याने विद्यापीठाच्या पातळीवर एक ऍडहॉक कमेटी नेमण्यात यावी असा आदेश दिला. दर विषयाला दर आठवड्याला पूर्वी ज्या तासिका होत्या त्याच कायम ठेवाव्या व नवे नियम मान्य केले जाऊ नये असेही आदेश शासनाने दिले. ११ सभासदांची नवी ऍडहॉक कमेटी कुलगुरुंनी माननीय बाबासाहेब घारफळकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे नियुक्त केली. या कमेटीवर शिक्षक प्रतिनिधीना टाळणे हे अशक्य होते आणि त्यामुळे प्रा.बी.टी.देशमुख यांचे बरोबर संघटनेमध्ये काम करणारे तीन शिक्षक प्रतिनिधी यांची या ऍडहॉक कमेटीवर नियुक्ती करण्यात आली होती. दर विषयाला दर आठवड्याला किती तास ठेवावे याबाबतचा कोणताही नियम नव्हता म्हणून विद्यापीठाने ठरवून दिलेले हे नियम ग्राह्य मानले पाहिजे व ऍडहॉक कमेटीला ते मान्य करण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. जवळ जवळ दोन तीन महिने अतिरिक्त शिक्षक निर्धारणाचे कार्य विद्यापीठामध्ये होत होते. शिक्षक प्रतिनिधीच्या संघटित भूमिकेमुळे आणि या समितीचे अध्यक्ष मा. श्री. बाबासाहेब घारफळकर यांच्या सहकार्यामुळे अतिरिक्त शिक्षकांवरचे एक फार मोठे संकट त्यावेळी टळले, अशी आमची धारणा आहे.

१४. पुढच्या काळामध्ये दर आठवड्याला दर विषयाला किती तास ठेवावे याबाबत ऍडव्हॉक कमेटीचा नियम, कुलगुरुंनी एका वेगळ्या पत्रकाने प्रसिद्ध केलेला नियम व महाराष्ट्र शासनाचे नियम अशी तिहेरी व्यवस्था किती तरी दिवस अस्तित्वात राहिली. पण शिक्षक प्रतिनिधीच्या संघटित प्रभावामुळे शेवटी ऍडहॉक कमेटीच्या नियमांना मान्यता मिळाली व कुलगुरुनीसुद्धा त्यांचे पत्रक मागे घेऊन अनेक महिने राहिलेली ही तिहेरी व्यवस्था संपुष्टात आणली गेली.

१५. **नागपूर विद्यापीठामध्ये स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या १९२३ ते १९७६ पर्यत कधीही करण्यात आलेली** नव्हती. चार वर्षे जे पद अस्तित्वात असेल ते पद स्पष्ट रिक्त समजले पाहिजे. स्पष्ट रिक्त पदावर नेमणूक ही प्रोबेशनवरच करण्यात आली पाहिजे. हा दोन वर्षाचा प्रोबेशन काळ संपल्यावर कन्फर्म करण्यात आले पाहिजे व **कन्फर्म केलेल्या शिक्षकाला विद्यापीठाच्या परवानगीशिवाय सेवेतून काढता कामा नये अशा प्रकारचा स्टॅट्युट ५३ नागपूर विद्यापीठामध्ये करण्यात आला.** अशा प्रकारचा परिनियम फक्त नागपूर व अमरावती विद्यापीठामध्येच अस्तित्वात आहे हे नमूद करताना आम्हांला आनंद होतो. **१९७६ नंतरच्या काळात शिक्षकांच्या सामायिक हिताच्या विरोधात निर्णय होणार नाहीत अशा प्रकारे विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या न्याय्य तरतुदीसाठी सिनेटवरील शिक्षक प्रतिनिधींनी जागता पहारा ठेवला हे कोणीही नाकबूल करणार नाही.**

१६. अमरावती विद्यापीठामध्ये १९९४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार होऊ घातलेली ही निवडणूक समोर आलेली असताना काय प्रश्न समोर आहेत याचे विवेचन पुढील परिच्छेदातून केलेले आहे. **हेही नुटाचेच आहेत. तेही नुटाचेच आहेत. अशी परिस्थिती असेल तेव्हा संघटनेला या कामात लक्ष देण्याची गरज राहत नाही. आतापर्यंत तशी गरज नव्हती परंतु शिक्षक म्हणून व्यावसायिक जीवनाच्या ज्या मूलभूत तत्त्वांचे संरक्षण करण्यासाठी संघटनेच्या नेतृत्त्वाखाली अनेकांनी अनेक वर्षे श्रम केलेत, जिवापाड मेहनत केली त्या बाबी उखडून टाकण्याचा संघटित प्रयत्न निवडणुकीच्या निमित्ताने कोणी करीत असेल तर त्या प्रयत्नांना संघटना म्हणून संघटित उत्तर देणे एवढाच पर्याय शिल्लक राहतो.** ग्रामीण भागातील प्राध्यापकांच्या कळवळयाच्या पोटी राजकीय पक्षाशी जवळून सोयरिक असलेले एक प्राचार्य ग्रामीण प्राध्यापकांचे “नवोदित नेते” म्हणून उदयाला येत आहेत. ग्रामीण भागात काम करणाऱ्या समस्त प्राध्यापकांनी आपल्या या नवोदित नेत्याची ओळख करून घेतली पाहिजे. प्राध्यापक या व्यवसायाविषयी त्यांचे विचार, त्यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांची शिक्षकांकडे पाहण्याची दृष्टी समजावून घेतली पाहिजे.

## परीक्षेच्या कामाची सक्ती

१७. विद्यापीठाच्या परीक्षा संचालनामधील शिक्षकांचा सहभाग हा कोणत्याही परिस्थितीमध्ये सक्तीचा असता कामा नये. स्वेच्छेने शिक्षकांनी हे काम करावयाचे आहे. त्याबद्दल त्या कामाचा मोबदला (Remuneration) देण्यात आला पाहिजे हे देशभर मान्य झालेले तत्त्व आहे. परीक्षेसाठी एका केंद्राधिकाऱ्याची गरज असेल तर ते काम करण्यासाठी १० माणसे स्वेच्छेने उपलब्ध असतात. काही प्राध्यापक वाचन, मनन, चिंतन, लेखन इत्यादीमुळे परीक्षेकडे वळत नसतील तरी परीक्षेच्या कामालासुद्धा पुरेसे शिक्षक सहजपणे उपलब्ध होतात. आपल्याला ते काम मिळत नाही याबद्दल अनेक लोक नाराज होतात. असे असताना एखाद्या परीक्षा केंद्रावर जर पुरेशा प्रमाणात शिक्षक या कामात सहभागी होत नसतील तर तो त्या केंद्राधिकाऱ्याच्या लायकीचा पुरावा समजला पाहिजे. **काहीही असले तरी परीक्षेचे काम या देशातील आजच्या कायद्याने सक्तीचे झालेले नाही.** १९७५ मध्ये नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने ठराव करून ‘परीक्षेचे काम केलेच पाहिजे

**आठवड्यातून चाळीस तास/तासिका शिकविले पाहिजे नाहीतर पगार कापू. दरमहिन्याला एक हजार रुपयाच्यावर ...**

(परिच्छेद ४२ व ४३ पहा)

नाहीतर डिरिकग्नाईज केले जाईल' असा एक सक्तीचा हुकूम काढला होता पण तो विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्र शासनाच्या धोरणाच्या विरोधात असल्यामुळे मागे घ्यावा लागला व त्यानंतरच्या गेल्या १० वर्षात महाराष्ट्रामध्ये असा प्रयत्नसुद्धा कोणीही केल्याचे आढळून येत नाही.

१८. **परीक्षेचे काम सक्तीचे आहे असे दाखवून आपल्या प्राध्यापकांचा छळ करणे हा आमच्या या नवोदित नेत्याचा आवडता छंद** आहे. खरे म्हणजे ज्येष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचा बोर्डाच्या परीक्षासंचालनाशी अर्थाअर्थी काही सबंध नाही. पण तरीही लोक सहकार्य देतात व ते दिले पाहिजे. पण हे काम सक्तीचे आहे असे जर कोणी म्हणत असेल तर ते संपूर्णपणे अज्ञानमूलक, बेकायदेशीर व दांडगाईचे बोलणे आहे. १४.३.९० ला या आमच्या नवोदित नेत्याने एक नोटीस काढली (नोटीसची प्रत शिक्षकांना न देणे, पण त्या नोटीसवर त्यांची सही घेणे हा यांचा आवडता छंद आहे) व बोर्डाच्या परीक्षेचे काम सक्तीचे आहे, ते तुम्ही केलेच पाहिजे असे ज्येष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना कळविले. १४.३.९० ला यांनी आपल्या प्राध्यापकांना दिलेल्या नोटीसमधील हा लाजिरवाणा मजकूर पुढील प्रमाणे :-

"सर्व वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सर्व कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, १२ वी बोर्डाची वार्षिक परीक्षा १७ मार्च पासून सुरू होत असल्यामुळे महाविद्यालयाची वेळ १७ मार्च ते २० एप्रिल पर्यंत १०.३० पासून करण्यात आली आहे. सर्वांनी वेळेवर हजर राहावे. **ज्या प्राध्यापकांना पर्यवेक्षकाचे काम दिले नसेल अशा प्राध्यापकांनी शिस्त टिकवून ठेवण्यासाठी पेपरच्या वेळेपर्यंत महाविद्यालयात थांबावे** "*(V1 P1)*

१९. प्राध्यापकांचे म्हणणे असे की आम्ही काम करायला तयार आहोत पण कोणत्या नियमानुसार सक्ती केली जात आहे हे सांगितले पाहिजे. कोणाला काम आहे याची निदान पूर्व कल्पना तरी आम्हांला दिली पाहिजे. **"नुसते कॉलेजमध्ये परीक्षा चालू असताना शिस्त टिकविण्यासाठी प्राध्यापकांना बसवून ठेवणे हे बिनडोकपणाचे आहे"** असे या प्राध्यापकांनी खरे म्हणजे कळवावयाला पाहिजे होते. पण त्यांनी अत्यंत नम्रपणे २२.३.९० ला एक अर्ज देऊन नियमांची विचारणा केली. या लहानशा कॉलेजमधील ९ प्राध्यापकांनी आपल्या प्राचार्यांना दिलेल्या अर्जात हे प्राध्यापक म्हणतात. :-

"महोदय,

आम्ही खालील सह्या करणारे वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आपल्या सेवेशी नम्र निवेदन सादर करतो की, आपल्या १४.३.९० च्या रजिस्टरवरील सूचनेनुसार (आदेश) आम्ही १२ वी बोर्डाच्या वार्षिक परीक्षेत पर्यवेक्षकाचे काम केले आहे, या सबंधी आम्ही नम्र विनंती करतो की, नागपूर बोर्डाच्या कोणत्या नियमानुसार आम्हाकडून सक्तीने पूर्व सूचित न करता वेळेवर पर्यवेक्षकाचे काम करून घेत आहात, त्याबद्दल बोर्डाच्या नियमाची आम्हांस माहिती करून द्यावी. आपल्याकडून आम्हांस बोर्डाच्या नियमाची माहिती मिळाली नाही तर आम्हांला आपला आदेश पाळता येणार नाही, त्याबद्दल क्षमा करावी." *(V 1 P6)*

२०. २२.३.९० ला प्राध्यापकांनी अर्ज दिल्यावर दुसऱ्याच दिवशी २३.३.९० ला या आमच्या नवोदित नेत्याने एक सूचना काढली. या सूचनेमध्ये असे म्हटले होते की, :-

" ज्या वरिष्ठ महाविद्यालयातील पर्यवेक्षकांनी नियमासाठी विचारणा केली आहे. त्यासंबधी निर्णयासाठी संबधित अधिकाऱ्यांना कळविले गेले आहे.... **ज्यांना ह्या सेवा नियमबाह्य स्वतःच्या अधिकारात वाटत असतील तर त्यांनी तसे नमूद करून सही करावी".**

२१. खरे म्हणजे प्राचार्य या नात्याने एखादी नोटीस शिक्षकाला द्यायची असेल तर ती देण्याचा प्राचार्यांना अधिकार असतोच. ती लेखी दिली पाहिजे व प्रत मिळाल्याबद्दल प्राध्यापकाने सुद्धा पोचदर्शक सही केली पाहिजे हा सुसंस्कृतपणाचा व्यवहार झाला. पण नोटीसची एकच प्रत पाठविणे, त्याची प्रत न देणे, चपराशाला स्पष्ट सूचना देऊन प्राध्यापकांच्या फक्त सह्या घेऊन ये म्हणणे हा जंगलीपणाचा व असंस्कृत व्यवहार आहे. "तुम्ही मला प्रत द्या म्हणजे मी मिळाल्याची सही करतो" असे एखाद्या प्राध्यापकाने म्हटले तर त्याचे हे कृत्य पूर्णपणे कायदेशीर आहे. आपल्या घाणेरड्या नोटीसमधील मजकूर एखाद्या प्राध्यापकाने लिहून घेतो म्हटले तर आमच्या या नवोदित नेत्याच्या नाकाला केवढ्या मिरच्या झोंबतात ते जरा पाहा. :-

"प्रा. शर्मा,

दि. २३.३.९० ची सूचना रामदास चिरडे शिपाई तुमच्या व २२.३.९० ला दिलेल्या आपल्या सामूहिक अर्जाच्या आधारावर सूचना देण्यासाठी घेऊन आला असतांना तीन प्राध्यापक हजर नसल्यामुळे आम्ही सह्या करत नाही, असे सूचित केले.

परंतु माझी सर्व सूचना आपण स्वतः सही न करता त्याचे समक्ष लिहून घेतल्याचे त्यांनी सूचित केले आहे. सही न करताना आपणांस माझी सूचना लिहून घेण्याचा अधिकार नाही. या सबंधी आपले स्पष्टीकरण ताबडतोब त्या शिपायाजवळ लिहून सादर करावे.त्या अनुषंगाने तुमच्यावर कारवाई होईल याची नोंद ध्यावी. सही न करण्याच्या प्रवृत्तीला आपणास व इतर सेवेत असणाऱ्यांना जबाबदार परीक्षेच्या दृष्टिकोनातून धरण्यात येईल याची नोंद ध्यावी." *(V1 P8)*

२२. ग्रामीण भागाचा हा नवोदित नेता एवढ्यावर थांबला नाही २६.३.९० ला ज्येष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना यांनी एक नोटीस दिली (सर्व नोटीसमध्ये मजकूर सारखाच आहे. फक्त प्रत्येकाचे नाव व नंबर वेगवेगळा टाकून दिला) या नोटीसमध्ये आमचे हे नवोदित नेते प्राचार्य या नात्याने लिहितात :-

**"बोर्डाच्या परीक्षा संचालनाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक मंडळाने महाविद्यालयाला दिल्यामुळे ती सेवा माझ्या अधिकारातील शिक्षकांना बंधनकारक आहे.** परंतु आपणास दि. २३.३.९० च्या पर्यवेक्षकाच्या सेवा दिल्या असताना आपण इतरांनी त्या सेवा नाकारल्या आहेत. त्यासंबधी स्पष्टीकरण दि. २३.३.९० ला आपणांकडून मागितलेले होते ते सादर केले नाही." पुढे ते म्हणतात - "सेवा नाकारणे नियमबाह्य आहे. आपणांस यासबंधात आज २७.३.९० ला दुपारी ४.०० वाजेपर्यत स्पष्टीकरण दिले नाही तर आपणास काही म्हणावयाचे नाही असे समजून हे प्रकरण कायदेशीररीत्या पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद ध्यावी." *(V1 P9)* दुपारी २ वाजता नोटीस द्यायची व ४ वाजेपर्यत स्पष्टीकरण मागायचे हा सुद्धा जंगलचाच कायदा आहे.

२३. एवढ्यावर जर ते थांबले असते तर ग्रामीण भागातील प्राध्यापकांचे नेतृत्त्व करण्याचा आमच्या या नवोदित नेत्याचा अधिकारच जणू काही गमावला गेला असता. कायद्याचा व नियमांचा कोणताही आधार नसतांना १२ वीच्या परीक्षेची ज्येष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना केलेली सक्ती व ते काम न केल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्याची धमकी त्यांनी खरी करून दाखविली. **नियम प्राचार्यांनाच माहीत नाही (किंवा जाणून बुजून त्यांनी प्राध्यापकांचा छळ करण्याचे ठरविले) तर मग व्यवस्थापक मंडळ तरी काय करणार?** १९ मे १९९० च्या बैठकीत या महाविद्यालयाच्या व्यवस्थापक

## परीक्षा घेण्याकरिता प्राध्यापक रहाणार नाही तर काय मोटार स्टँडवरील हमालांना पाचारण करायचे?

(परिच्छेद २३ पहा)

मंडळाने केलेल्या ठराव क्रमांक ४ मधील पुढील महत्त्वाचा भाग पाहण्यासारखा आहे :-

"**या संदर्भात विचारण्यात आलेली माहिती प्राचार्यांनी सभेसमोर सादर केली.** या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात येऊन जे प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकवितात त्यांनी परीक्षा घेणे हे त्यांचे नैतिक कर्तव्य ठरते. त्यांनी परीक्षा घेण्याच्या दृष्टीने पर्यवेक्षक म्हणून राहण्यास केलेली कसूर ही अत्यंत गंभीर बाब होय. **परीक्षा घेण्याकरिता प्राध्यापक राहणार नाहीत तर काय मोटार स्टँड वरील हमालांना पाचारण करावयाचे?** अशीही संतप्त प्रतिक्रिया काही सदस्यांनी व्यक्त केली. चर्चेअंती खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव** :- प्राध्यापकांनी नाकारलेली सेवा ही अत्यंत गंभीर बाब समजून दि. १७.३.९० परीक्षा सुरू झाल्यापासून तो परीक्षा संपण्याची शेवटची तारीख दि. ३१.७.९० ह्या कार्यकाळात हे प्राध्यापक रजेवर होते असे समजून या कालखंडाचा पगार देण्यात येऊ नये किंबहुना दिलेला असल्यास तो परत घेण्यात यावा, याशिवाय त्यांना जी शिक्षा योग्य ठरेल ती करण्यात यावी, अशी विनंती अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू, अध्यक्ष, म.रा.शिक्षण मंडळ, नागपूर आणि शिक्षण संचालक, पुणे यांना करण्यात यावी. ठराव सर्वानुमते मंजूर" *(V4 P2)*

२४. आमच्या या नवोदित नेत्याने ४ जून १९९० रोजी प्राध्यापकांना लिहून ही कारवाई पुढील शब्दात कळविली.

"विषय : ठराव क्र. ४ दि. १९.७.९० च्या बाबतः

वरील दि. १९.७.९० च्या गव्हर्निंग बॉडीच्या सभेतील ठराव क्र.४ ची प्रत सोबत जोडली आहे. त्या अनुषंगाने कारवाई केलेली आहे. सूचनेची नोंद घ्यावी. या कारवाईच्या अनुषंगाने प्रशासनात व दैनंदिन शैक्षणिक कार्यात अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी." *(V4 P1)*

२५. दादागिरीचा हा केवढा भयंकर प्रकार म्हटला पाहिजे. १२ वी च्या परीक्षेची नियमबाह्य व बेकायदेशीर सक्ती, प्राध्यापकांना नोटीस देणे, प्रत न देणे, कार्यालयीन कॉपीवरच सही घेणे, २ वाजता नोटीस देवून ४ वाजता खुलासे मागणे, बेकायदेशीररीत्या पगार कपात, खोटेनाटे आरोप करणे यामुळे त्या प्राध्यापकांची काय मनःस्थिती झाली असेल याचा आपण विचार करू शकतो. या ९ ज्येष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांनी आपल्या प्राचार्यांना २७.६.१९९० रोजी एक अर्ज दिला. त्यामध्ये ते प्राध्यापक म्हणतात.

"प्रति,
माननीय प्राचार्य साहेब,
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ.

आम्ही वरिष्ठ महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक आपणास नम्र विनंती करतो की, १० वर्षापासून त्यात मागील एक दीड वर्षापासून तर आमचेवर खोटेनाटे आरोप करून आमचा जाणीवपूर्वक मानसिक छळ करीत आहात. ह्या छळांची परिसीमा ठरावानुसार आमचा १७ मार्च ९० ते ३१ मे १९९० पर्यंतचा म्हणजेच अडीच महिन्याचा पगार आपण बेकायदेशीररित्या कापणार आहात. त्यानुसार माहे मे ९० चा पगार कापलेला आहे. या व अन्य कारणामुळे जी आम्ही आपणास वेळोवेळी लेखी व तोंडी कळविली आहे. त्यामुळे आमचे मानसिक स्वास्थ बिघडले आहे. तसेच आमच्या स्वास्थ्याबरोबरच आमच्या कुटुंबियांचे स्वास्थसुद्धा बिघडलेले असून आमची आर्थिक संकटामुळे उपासमार होत आहे.

आपणांस नम्र विनंती की, वर नमूद केलेल्या काळातील आमचे वेतन ताबडतोब देण्यात यावे. तसेच आमचेवर जो अन्य बाबतीत जाणीवपूर्वक अन्याय करण्यात आलेला आहे तो सुद्धा दूर करण्यात यावा." *(V4 P3)*

## 'भव्य' प्रमाणात पगार कपात आणि तक्रारनिवारण समितीबाबतचा दृष्टिकोन.

२६. **कोणत्याही प्रकारची कारणे न देता फार मोठ्या प्रमाणामध्ये आपल्या प्राध्यापकांच्या पगारामध्ये कपात करावयाची हा आमच्या या नवोदित नेत्याचा मोठा आवडता छंद आहे. मी पगार कपात तर करतोच पण त्याविरुद्ध कोणी तक्रार करू नये. विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे कोणी अर्ज केलाच तर तक्रार निवारण समितीने तो अर्ज ऐकू नये अशी त्यांची भूमिका असते. अर्ज ऐकला आणि कपातीचा निर्णय रद्द ठरविण्याचे सोडा पण स्थगित जरी केला तरी ती तक्रार निवारण समिती बेकायदेशीर आहे.** विद्यापीठाला हा अधिकारच नाही अशी बोंब मारायला हे पुन्हा तयारच असतात. उदाहरण म्हणून.या महाविद्यालयातील मराठीच्या ज्येष्ठ महिला प्राध्यापिकेच्या तक्रारीचे स्वरुप आपणा सर्वांच्या लक्षात यावे म्हणून अमरावती विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीच्या अहवालातील पुढील भाग मी उद्धृत करीत आहे. :-

"तक्रार समितीकडे विचारार्थ आलेल्या तक्रार क्र. ५८ च्या संबंधाचा समितीचा अंतरिम अहवाल.

अर्जदाराचे नाव :- प्रा. सौ.एन.बी.महात्मे
अधिव्याख्याता मराठी, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा (जि. यवतमाळ)

अर्जदाराने केलेल्या तक्रारीचे स्वरूप :

प्राचार्य, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा यांचेकडून होणाऱ्या बेकायदेशीर पगार कपातीबाबत अर्जदाराने आपल्या तक्रार अर्जात खालील प्रमाणे तपशील दिलेला आहे.

१) अर्जदाराच्या जून १९९० च्या पगारातून रु. ६३१ ची कपात करण्यात आली.

२) पगार कपातीचे कारण व अर्जदाराने मागितलेला रजेचा हिशेब वारंवार विनंती करूनही प्राचार्याकडून न मिळण्याची तक्रार अर्जदाराने केली आहे.

३) अर्जदाराच्या ऑगस्ट १९९० च्या पगारातून केलेली रु. १२५१ ची कपात.

४) सप्टेंबर ९० च्या अर्जदाराच्या पगारातून रु. १२५१ ची केलेली कपात.

५) अर्जदाराने रीतसर नियामक मंडळाचे अध्यक्षांकडे तक्रार केल्यानंतरही त्याची दखल घेतली जात नसल्याबद्दलची अर्जदाराची तक्रार.

६) अर्जदाराने आतापर्यंत झालेली रु. ३१३३ ची कपात व त्या कपातीसंबंधी वारंवार विचारणा करूनही अर्जदाराला त्याचे उत्तर प्राप्त न होण्याची अर्जदाराची तक्रार.

वरील सर्व बाबीमुळे अर्जदाराचा मानसिक आणि आर्थिक छळ होत असल्याची तक्रार आहे. अर्जदाराने आपल्या तक्रार अर्जासोबत एकूण ८ सहपत्रे जोडली आहेत."*(V3 P205)*

२७. आपला अंतरिम अहवाल कार्यकारी परिषदेपुढे मांडत असतानाच २.२.९१ रोजी प्राचार्य प.सि.काणे यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी

**आम्ही दरमहा कारण न देता हजार रुपयाच्यावर पगार कापू , ते कायदेशीर. पण कपातीला नुसती स्थगिती दिली तर तक्रार निवारण समिती मात्र बेकायदेशीर**

(परिच्छेद २६ ते ३६ पहा)

मंडळाच्या या तक्रार निवारण समितीने अशी शिफारस केली की :-

३) "समितीकडे आलेल्या तक्रारीमध्ये अत्यंत निकडीची तक्रार म्हणून प्रा. सौ.एन.बी. महात्मे, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ यांच्या तक्रार प्रकरण क्रमांक ५८ वर विचार करून त्याबाबत कार्यकारी परिषदेला खालील शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.:-

प्रा.सौ. एन.बी. महात्मे यांच्या वेतनातून प्राचार्यांव्दारे करण्यात येत असलेली वेतन कपात त्यांच्या तक्रार प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत स्थगित ठेवण्याचा आदेश, वेळोवेळी त्यांचे वेतनातून होणाऱ्या मोठ्या रकमेचे गांभीर्य लक्षात घेता, कार्यकारी परिषदेने संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना द्यावा. कार्यकारी परिषदेची सभा विलंबाने होणार असेल तर समिती मा. कुलगुरुंना अशी विनंती करते की, मा. कुलगुरुंनी कायदा कलम ११ (४) मधील तरतुदी अंतर्गत या संबंधाचा निर्णय घ्यावा. जेणे करून वेतन कपातीस तक्रार प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत प्रतिबंध घातला जाऊ शकेल" *(V3 P204)*

२८. या प्रकरणाचे गांभीर्य, एका ज्येष्ठ महिला प्राध्यापिकेचा होत असलेला मानसिक व आर्थिक छळ लक्षात घेऊन तक्रार निवारण समितीची शिफारस मा. कुलगुरुंनी कार्यकारी परिषदेच्या वतीने विद्यापीठ कायद्याच्या कलम ११ (४) अन्वये मान्य केली व कपात स्थगिती चा विद्यापीठाचा आदेश महाविद्यालयाला कळविला. शिक्षकव्देषाने पछाडलेल्या या आमच्या नवोदित नेत्याच्या अंगाचा त्यामुळे मोठा तिळपापड झाला. त्यांनी ती तक्रार निवारण समिती बेकायदेशीर आहे अशी बोंब मारायला सुरुवात केली. महाराष्ट्राचे मा. राज्यपाल व अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलपतींना १९ फेब्रुवारी १९९१ रोजी पाठविलेल्या एका तक्रार अर्जात आमच्या या नवोदित नेत्याने अशी प्रार्थना केली आहे की,

**"अधिकार नसताना तक्रार निवारण समितीची प्रा. सौ. एन.बी.महात्मे यांच्या पगारकपाती प्रकरणात केलेली शिफारस व त्याअनुषंगाने झालेली कारवाई नियमबाह्य असल्यामुळे ती रद्द करण्यात यावी. व तो निर्णय आम्हाला एक महिन्याच्या आत कळवावा "***(V3 P145)*

२९. कोणतेही कारण न देता हजार पंधराशे रुपये दर महिन्याला हे कपात करतील. **कपातीचा निर्णय विद्यापीठाने रद्द नाही ठरविला, फक्त स्थगिती दिली तर हे तक्रार निवारण समिती व कुलगुरू यांच्या नावाने ठणाणा करतील.** कॉलेज कोड ऑर्डिनन्सच्या परिच्छेद ५२ नुसार तक्रार निवारण समितीची व्यवस्था ही गेल्या ५० वर्षापासून नागपूर विद्यापीठामध्ये अस्तित्वात आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी अशी तक्रार निवारण समिती १९५४ च्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेली दिसून येते. पूर्वी सेवामुक्तीच्या तक्रारीसुद्धा ही तक्रार निवारण समितीच ऐकत असे. १९७७ च्या दरम्यान सेवामुक्तीच्या तक्रारी ऐकण्यासाठी न्यायाधिकरणाची स्थापना झाल्यापासून सेवामुक्ती शिवायच्या इतर तक्रारी ऐकून त्यावर निर्णय देण्याचे काम ही समिती करीत असते.

३०. या समितीचे प्रयोजन अतिशय साधे सरळ आहे. उदाहरणच देऊन सांगायचे झाले तर ते पुढील प्रमाणे सांगता येईल. प्रा. व्ही.के.वसू हे विज्ञान शाखेतील ज्येष्ठ प्राध्यापक आहेत. आपल्या विषयात तज्ज्ञ आहेत. विषयावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. उत्तम क्रीडापटू आहेत. नेमाने व नेकीने आपले काम करणारे आहेत. अमरावती विद्यापीठाने एक पत्र लिहून विद्यार्थ्यांच्या निवडणुकीच्या संचालनामध्ये त्यांचा सहभाग मागितला. या पत्राची प्रत त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनाही विद्यापीठाने पाठविली. या कामासाठी शिक्षकांची रजा ही कर्तव्यस्थ रजा समजावी असा कायदा आहे. कर्तव्यस्थ रजेचा अर्ज १४ सप्टेंबर १९८८ रोजी देऊन प्रा. वसू हे १७ सप्टेंबर १९८८ च्या विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुकीच्या संचालनामध्ये सहभागी झालेत. त्यांच्या प्राचार्यांनी त्यांची त्या दिवसाची रजा नामंजूर करून त्यांचा एक दिवसाचा पगार कापला. प्रश्न दिसायला लहानसा आहे. पण अशा बेकायदेशीर कपातीविरुध्द त्या प्राध्यापकाने काय करावे? कुस्त्या खेळाव्यात? का भांडणे करावीत ? अशा वेळी तक्रारनिवारण समितीपुढे जाणे एवढाच उपाय शिल्लक राहतो. अमरावती विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने प्रकरण ३७ मध्ये ही कपात बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा दिला.

**३१. गेल्या ५० वर्षापासून अत्यंत उपयुक्त ठरलेल्या तक्रार निवारण समितीसारख्या यंत्रणेच्या मुळावरच घाव घालायला निघालेले आमचे हे नवोदित नेते "तक्रार निवारण समितीची शिफारस व त्याअनुषंगाने केलेली कारवाई रद्द करण्यात यावी"** अशी केवळ विनंती करून थांबले नाहीत तर त्यांनी **"तो निर्णय आम्हाला एक महिन्याच्या आत कळवावा"** असा विनंतीवजा हुकूमच महाराष्ट्राच्या राज्यपालांना सुनाविला आहे.

३२. महाराष्ट्राच्या राज्यपालांना अमरावती विद्यापीठाचे मा. कुलपती या नात्याने १९ फेब्रुवारी १९९१ च्या पत्रान्वये **"तो निर्णय आम्हाला एक महिन्याच्या आत कळवावा" असा जो हुकूम (विनंतीचा झगा चढवून) आमच्या या नवोदित नेत्याने दिला तो त्यांनी पाळला किंवा नाही किंवा त्यावर काय केले हे माझ्याकडील कागदपत्रात दिसून येत नाही** पण "नुटा प्राध्यापकांचे वैयक्तिक प्रश्न स्वीकारत नाही तर सामूहिक प्रश्न धसास लावते. आम्ही मात्र प्राध्यापकांच्या वैयक्तिक प्रश्नाकडेही लक्ष देणार आहोत" असा आज टाहो फोडणाऱ्या या आमच्या नवोदित नेत्याने वैयक्तिक तक्रारीच्या निवारणासाठी **अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेली तक्रारनिवारण समितीची यंत्रणा पूर्णपणे बेकायदेशीर असल्यामुळे रद्द ठरवावी अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सादर केली.**

३३. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर (Writ Petition No. 1696 of 1992) प्राचार्य या नात्याने जी याचिका दाखल करण्यात आली होती त्या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाला अर्जदाराने केलेली एक विनंती अशी होती की :- It is therefore prayed that this Hon'ble court be pleased to b) Quash & set aside the Grievance Committee established by the Amravati University in relation to the petitioner college as the establishment of the said Grievance Committee is without jurisdiction by an appropriate writ, order or direction. *(V3 P187)*

३४. मा. न्यायमूर्तीव्दय एच. डब्ल्यु. धाबे व जी.डी.पाटील यांच्या खंडपीठाने दिनांक १९ जानेवारी १९९३ रोजी या प्रकरणात **"अमरावती विद्यापीठाची तक्रार निवारण समिती बेकायदेशीर असल्याच्या अर्जदाराच्या म्हणण्यात काहीही तत्थ्य नाही" ("is devoid of any merit")** असा निर्णय दिला. मा. खंडपीठाचा हा निकाल याच अंकात पूर्णपणे शब्दशः छापलेला आहे.

३५. उच्च न्यायालयामध्ये गैरअर्जदार या नात्याने समजा अमरावती विद्यापीठाने बाजू मांडली नसती किंवा बाजू मांडल्यानंतरसुद्धा निकाल विरुद्ध गेला असता व तक्रार निवारण समिती बेकायदेशीर ठरली असती तर काय प्रसंग ओढवला असता यांच्या नुसत्या कल्पनेनेसुद्धा अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाहीत. **सेवामुक्तीच्या तक्रारी सोडून इतर सर्व तक्रारीच्या बाबतीत शिक्षकांना भिकेची झोळी घेऊन दारव्ह्याची गाडी पकडावी लागली असती म्हणजे मग आमच्या या नवोदित नेत्याचा आत्माराम शांत झाला असता.**

३६. सेवामुक्तीशिवायच्या तक्रारी संदर्भात माध्यमिक शिक्षकांच्या व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत तक्रार निवारणाचे जे अधिकार शिक्षणाधिकारी किंवा शिक्षण उपसंचालक यांना आहेत ते व तसे अधिकार गेल्या अनेक वर्षापासून तक्रार निवारण समितीच्या (का.प.) माध्यमातून विद्यापीठाला आहेत. ही व्यवस्था मोडून काढण्याचे होत असलेले हे प्रयत्न शिक्षक चळवळीतील कोणत्याही कार्यकर्त्याला अस्वस्थ करणारे होते. याच वेळी विद्यापीठ विधेयकासाठी नेमलेल्या उभय सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकी चालू होत्या. एक सदस्य या नात्याने या समितीच्या कामामध्ये

**परिनियम ७३ ला यांचा विरोध कारण यांना आवडत नसलेल्या शिक्षकांना काढून टाकण्याची यांची इच्छा अपुरी राहते**

(परिच्छेद ३८ पहा)

सहभागी होताना तक्रार निवारण समिती ही कायद्याने निर्माण केलेली व सक्षम असावी असा आम्ही आग्रह धरला. १९९४ च्या विद्यापीठ कायद्याच्या कलम ५७ मध्ये या तक्रार निवारण समितीची व्यवस्था आता करण्यात आली असून ढोबळमानाने नागपूर/अमरावती विद्यापीठामध्ये पूर्वी अस्तित्वात असलेल्या धर्तीचीच ह्या तक्रार निवारण समितीची व्यवस्था आहे. **विद्यापीठामध्ये असलेली तक्रार निवारण समितीची व्यवस्था उध्वस्त करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे कॉलेज कोडने निर्माण केलेली तक्रार निवारण समितीची यंत्रणा ही विद्यापीठ कायद्याने निर्माण केलेली यंत्रणा म्हणून उदयास येण्यास हातभारच लागला हे सुद्धा आमच्या या नवोदित नेत्याचे शिक्षकांवर मोठे उपकारच म्हटले पाहिजे.!**

## परिनियम ५३ बद्दलची यांची भूमिका

३७. बोर्डाच्या परीक्षेचे काम सक्तीचे म्हणून केले पाहिजे. ४० तास/तासिकांचे वेळापत्रक घेतले पाहिजे हे केले नाही तर करार तुटलाच म्हणून समजा. २२/२३ मार्च१९९१ ला शिक्षण सचिवांना पाठविलेल्या पत्रात आमचे नवोदित नेते म्हणतात :-

"दि. १५.३.९१ ला शिक्षण संचालक पुणे कार्यालयाला दिलेल्या पत्राच्या प्रतीनुसार स्टॅट्युट १,१९७९ व स्टॅट्युट १,१९८९ नुसार मूल्यनिर्धारणाच्या महाविद्यालयाने केलेल्या शिफारसीनुसार संबधित ९ प्राध्यापकांना करार तोडल्यामुळे त्यांची वेतन निश्चिती पूर्वनिश्चित करण्यात आली नाही." वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीमधील प्राध्यापकांची स्थाननिश्चिती रोखून ठेवण्यात कसायाला गाय कापताना होणाऱ्या आनंदापेक्षा जास्त आनंद यांना होणार. वेगवेगळ्या प्रकारचे उलटसुलट शेरे मारल्यामुळे अजूनही या महाविद्यालयातील काही प्राध्यापकांची वरिष्ठ व निवडश्रेणीतील स्थाननिश्चिती झालेली नाही. ज्यांची झाली त्यांची अनेक दिवसांच्या विलंबाने झाली.

३८. कोणत्याही कायम शिक्षकाला केव्हाही सेवेतून काढून टाकण्याचे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर वाढलेले होते. न्यायाधिकरणाची व्यवस्था त्यावेळी अस्तित्वात नव्हती. सेवेतून बाहेर फेकल्या गेल्यावर शिक्षकाला तक्रार निवारण समिती व नंतर हायकोर्टाची पायरी चढल्याशिवाय न्याय मिळत नसे. १९७६ मध्ये नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर निवडून गेल्यानंतर स्पष्ट रिक्त पदाची व्याख्या करणारा परिनियम ५३ तयार करण्यामध्ये पुढाकार घेण्याची संधी संघटनेचा प्रतिनिधी या नात्याने मला मिळाली. ७ ऑक्टोबर १९७७ ला नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने व १५ ऑक्टोबर १९७७ ला सिनेटने मंजूर केलेल्या या परिनियमाला २७ जून १९७८ रोजी मा. कुलपतींनी अधिसंमती दिली व त्याच दिवसापासून तो परिनियम अमलात आला. 'विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कायम शिक्षकाला सेवेतून काढता येणार नाही" अशी या परिनियमांमध्ये तरतूद आहे. व या तरतुदीने आतापावेतो अनेक प्राचार्य व शिक्षकांचे जीव वाचविले आहेत. शिक्षकाला कान धरून खाली बसवण्यामध्ये व मान धरून हाकलून लावण्यामध्ये अडचण झालेल्या या परिनियम ५३ ला रद्द करण्यात यावे अशी मनोमन भावना असली तरी ती उघड व्यक्त करण्याची लाज वाटणारे लोक या परिनियमाचा पुनर्विचार करा असा विचार कधी लाजत तर कधी निलाजरेपणाने मांडत असतात. २२/२३ मार्च १९९१ रोजी शिक्षण सचिवांना लिहिलेल्या पत्रात आमचे नवोदित नेते लिहितात :-

"कायद्याच्या ४३ व ४५ कलमानुसार अन्यायाविरुद्ध दाद मागण्याची संधी विद्यापीठाकडे व न्यायालयाकडे शिक्षकांना दिली आहे. कायदा १९८३ अस्तित्वात आल्यामुळे स्टॅट्युट ५३ १९७८ मध्ये व्यवस्थापनाने शिक्षकांना कमी करण्यासंबंधात कार्यकारी परिषदेची मान्यता घ्यावी. या संबंधित आहे. त्यानुसार त्याला मान्यता मिळाली नाही. अधिनियम १९८३ लागू झाल्यानंतर अधिनियम १९७८ मधील स्टॅट्युट ५३ मधील कार्यकारी परिषदेच्या कमी करणाऱ्या शिक्षकांना कारवाईसंबधी मान्यतेची आवश्यकता आहे काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण ४३ व ४५ कलमानुसार ह्याबाबी नवीन कायद्यात निश्चित झाल्या आहे." *(V3 P158)* (भाषा त्यांची जशीच्या तशी दिली आहे.)

३९. ग्रामीण भागातील शिक्षकांना विद्यापीठ परीक्षेचे काम देत नाही, सहकेंद्राधिकारी म्हणून नेमत नाही. असा आज टाहो फोडणाऱ्या आमच्या या नवोदित नेत्याला विद्यापीठाने प्राचार्य या नात्याने सहकेंद्राधिकारी म्हणून काम करण्यासाठी प्राध्यापकांची नावे पाठवा म्हणून कळविले तर कोणत्याही नावाची शिफारस करावयाची नाही आणि इतक्याउपर विद्यापीठाने एखाद्या प्राध्यापकाची सहकेंद्राधिकारी म्हणून विद्यापीठ परीक्षेच्या कामासाठी नेमणूक केली तर त्याबाबत एखाद्या कुबुध्दीच्या म्हातारीने कडाकड बोटे मोडावी असा जळफळाट करण्यामध्ये हे आघाडीवर. दिनांक २२/२३ मार्च १९९१ ला रजिस्टर पोस्टाने विद्यापीठाविरुद्ध शिक्षण सचिवाकडे केलेल्या एका तक्रारीमध्ये हे म्हणतात :-

"१९९१ च्या उन्हाळी परीक्षेत महाविद्यालयाने सहकेंद्राधिकारी म्हणून नियुक्त करण्याकरिता कोणत्याही प्राध्यापकाची विद्यापीठाकडे शिफारस केली नसताना व तसे दि. २.१.९१ च्या पत्रानुसार कळविले असतांना ते विचारात न घेता विद्यापीठ स्तरावरील समितीने प्राचार्याचे प्रशासकीय अधिकार डावलून परस्पर स्वेच्छेने प्राचार्याच्या नियंत्रणातील एका प्राध्यापकाची सहकेंद्राधिकारी म्हणून नियुक्ती केली." *(V3 P157,158)*

४०. २२/२३ मार्च १९९१ च्या शिक्षण सचिवांना लिहिलेल्या उपरोक्त पत्रात हे लिहितात :-

"२. आमच्या दि. २६.२.९१ च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाचे १९८२ चे कायद्यानुसार पर्यवेक्षकांच्या सेवा, अनुदान मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वे १९८५ नुसार शिक्षकांना बंधनकारक असून त्यांनी सेवा नाकारून परीक्षेत अडथळा आणला. त्या सेवेसंबंधी दि. २७.२.१९८९ चा महाराष्ट्र शासनाचा निर्णय स्टॅट्युट १,१९८९ नुसार विद्यापीठ अधिनियम १९८३ कलम २४ कारवाई झाली नाही." *(V3 P 157)* (भाषेची रचना त्यांचीच)

एवढ्यावरच ते थांबत नाहीत तर या पत्रात ते पुढे म्हणतात

**"असे असताना महाविद्यालयाने काम न करण्यासंबधी प्राध्यापकांनी लेखी सूचित केल्यामुळे सत्र १९९०-९१ मध्ये शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करण्याची परवानगी मागितली होती. तसेच काम न करणाऱ्या शिक्षकांना कमी करण्याची परवानगी स्टॅट्युट ५३, १९७८ नुसार मागितली होती. परंतु परवानगी न मिळाल्यामुळे अनुदान मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठाच्या स्टॅट्युट १, १९८९ नुसार शैक्षणिक कार्य होण्यात अडथळा निर्माण झाला.** पुढील सत्रात शैक्षणिक कार्य वरीलप्रमाणे नियमानुसार होण्यासाठी हे अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अटळ आहे".

ऐका हो ऐका ! १२ व्या वर्गाच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी कायद्यानुसार पर्यवेक्षक सेवा बंधनकारक आहेत. दारव्ह्याबाहेरच्या प्राचार्यांना व प्राध्यापकांना अजून ठाऊक नाही तेथील प्राध्यापकांनी (बंधनकारक असताना) सेवा नाकारून परीक्षेत अडथळा आणला. काम न करण्यासंबधी प्राध्यापकांनी लेखी सूचित केल्यामुळे काम न करणाऱ्या शिक्षकांना कमी करण्याची परवानगी

**ग्रामीण भागातील प्राध्यापकाला विद्यापीठाने सहकेंद्राधिकारी नेमले तर हे आतून लेखी विरोध नोंदविण्याचा तमाशा करणार वरून कळवळ्याचे कीर्तन चालूच आहे**

(परिच्छेद ३९ पहा)

परिनियम ५३ नुसार मागितली. परंतु परवानगी न मिळाल्यामुळे शैक्षणिक कार्य होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. **विद्यापीठाच्या या गुन्ह्यामुळे आता ग्रामीण भागातील मंचरलेले लोक विद्यापीठ ताब्यात घेण्यासाठी येत आहेत. अमरावती विद्यापीठाच्या क्षेत्रात 'दारव्हा या बेटावर' वेगळयाच कायद्यांचे हे जे राज्य चालू आहे त्याचे "हास्यास्पद" आणि 'पोरकट' यापेक्षा वेगळ्या शब्दांनी वर्णन तरी करता येईल काय?**

## ४० तासाबाबतची यांची भूमिका

४२. आमच्या या नवोदित नेत्याचा भेजा शिक्षकाविषयीच्या व्देषाच्या विकृतीने किती पछाडलेला आहे हे पहायचे असेल तर "40 clock Hours" बाबतची त्याची भूमिका पाहा. सरदार वल्लभ भाई पटेल यांनी ६०० च्या वर संस्थाने भारतामध्ये विलीन केलीत. पण ४० तासाबाबतची यांची भूमिका पाहिली म्हणजे स्वतंत्र भारतामध्ये दारव्हा या नावाचे संस्थान अजून कायम आहे याबाबतची खात्री पटल्याशिवाय राहत नाही. वस्तुतः "४० तासाचे वर्कलोड" हे विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिले असून त्याला कोणाचाही विरोध नाही. या ४० तासांपैकी आठवड्याला सरासरी २० ते २४ तास महाविद्यालयामध्ये उपस्थितीचे असून त्यापैकी १५ तास "क्लास रुम टीचींग" साठी द्यावयाचे आहेत पण या महोदयाचे म्हणणे असे आहे की ४० तास / तासिका प्रत्यक्ष शिकविले पाहिजे. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर (Writ Petition No. 1696 of 1992) दाखल केलेल्या या याचिकेच्या परिच्छेद ४ मध्ये ते म्हणतात :-

"According to other requirements of the University Grants Commission and the Amravati University, a full paid teacher is required to take up 40 clock Hours of service i.e.lectures, practicals, tutorials etc. together." *(V3 P182,183)*

४३. या महाविद्यालयातील मराठीच्या ज्येष्ठ प्राध्यापिका सौ. महात्मे यांनी ३१ ऑगस्ट १९९० रोजी एक अर्ज करून **"संदर्भीय वेळापत्रकानुसार माझी सेवा रोज साडेसात तास होते. याचा माझेवर शारीरिक व मानसिक परिणाम होतो ही बाब नियमबाह्य आहे"** *(V2 P66)* असे कळविले. वेळापत्रक बदलून द्यावे अशी विनंती केली अन्यथा शेवटचा पिरीयड घेणे मी बंद करीन असेही त्यांनी प्राचार्यांना कळविले. प्राचार्यांनी या गुन्ह्याबद्दल पगार कपात सुरू केली व तेथून ५-६ महिन्यानी विद्यापीठाने सौ.महात्मे यांच्या तक्रारीवर मागितलेला खुलासा देताना ६ मार्च ९१ च्या पत्रान्वये विद्यापीठाला असे कळविले की :-

**"ऑगस्ट ९० च्या पगारातून केलेली रुपये १२५१ ची कपात वेळापत्रकानुसार त्यांना दिलेल्या तासिका न घेण्याचा त्यांचा अर्ज दि. ३१.८.९० ला मिळाल्यामुळे केलेली आहे.** तसा पगार पटावर उल्लेख केला आहे. व ही बाब पत्र क्र. मुंमम/१२१०/९० दि. ४.९.९० नुसार मा. शिक्षण संचालक पुणे यांना कळविण्यात आलेली आहे. **त्यांच्या अर्जात त्यांची सेवा चार तासापेक्षा अधिक सेवा होते** असे नमूद केलेले आहे. दि. १८ ऑगस्ट ८६ चे अमरावती विद्यापीठाचे पत्र क्र. एयू/६-ड/यूजीसी-नोटीफिकेशन/एफ/७४४/८८ नुसार **आठवडी ४० तासांचे वेळापत्रक लावून त्याची प्रत विद्यापीठाला पाठविलेली आहे."**. *(V2 P 31,32)*

"४० तासाचे वेळापत्रक लावून त्याची प्रत विद्यापीठाला पाठविलेली आहे" असे निगरगट्टपणे विद्यापीठाला कळविणाऱ्या या नवोदित नेत्याच्या कोडगेपणाला काय म्हणावे? दारव्ह्याच्या तिकडून दिग्रस, इकडून नेर नावाचे गाव आहे, वर यवतमाळ हे जिल्ह्याचे ठिकाण आहे, अमरावती हे विद्यापीठाचे मुख्यालय आहे, झालेच तर नागपूर उपराजधानी असून मुंबई राजधानी आहे, तेथेहि महाविद्यालये आहेत व तेथल्या कोणत्याही महाविद्यालयामध्ये ४० तासाचे वेळापत्रक लावलेले नाही हे या माणसाला ठाऊक नसेल असे समजावे काय? की आपल्या राजधानीत आपण राजे आहोत! राजे हो! या भावनेने हा सारा प्रकार झाला असेल?

## नेटग्रस्ताबाबतचा यांचा 'कळवळा' आणि आमची भूमिका

४४. शिक्षकहिताचे कितीही कातडे पांघरले तरी तोंड उघडल्याबरोबर त्याचे खरे स्वरूप उघड झाल्याशिवाय राहत नाही. ९ फेब्रुवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने पूर्वीच भरती झालेल्या प्राध्यापकांसाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा ३१ मार्च १९९४ पूर्वी उत्तीर्ण करणे सक्तीचे करणारे एक परिपत्रक पूर्वलक्षी प्रभावाने काढले. तर ग्रामीण भागाचे नेतृत्त्व करणाऱ्या आमच्या या नवोदित नेत्याने विद्यापीठावर १५-२० शिक्षकांचा मोर्चा नेला व विद्यापीठाकडे लेखी अर्ज देऊन "ही मुदत वाढवून देण्याची मागणी केली" १५.४.१९९४ रोजी मा. कुलपतींना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या पत्रात हे नवोदित नेते लिहीतात :-

"२) ८९ चा शासनाचा जो निर्णय विद्यापीठाने स्टॅट्युट १ दिनांक २७ फेब्रुवारी १९८९ नुसार अमरावती विद्यापीठाला लागू केलेला आहे व त्या शासकीय निर्णयानुसार ८९ नंतर भरती प्रत्येक प्राध्यापकाला पाच वर्षात एन.ई.टी. आवश्यक आहे. असा असतांना ही त्या निर्णयाची जाण महाविद्यालयाला करुन दिलेली नाही.

३) जर एन.ई.टी. ही परीक्षा शासकीय निर्णयानुसार ८९ पासून भरती होणाऱ्या प्रत्येक प्राध्यापकाला पाच वर्षाच्या आत पूर्ण करण्याचे शासनाचे आदेश होते तर विद्यापीठाने प्रत्येक वर्षाच्या जाहीराती देत असतांना पाच वर्षाच्या आत पूर्ण करण्याची अट टाकून महाविद्यालयाला जाहिराती मान्य करुन का दिल्या नाही?

४) या कालखंडात जर शासनाचा निर्णय पाच वर्षाच्या आत एन.ई.टी. करणे बंधनकारक होते व तसेच अनुदान मंडळाचे आदेश होते तर विद्यापीठ स्तरांवरील अर्थॉरिटींनी स्वतःच्या कक्षेत नसतानाही एन.ई.टी.च्या अटींचे रिलॅक्सेशन कोणत्या अधिकाराने दिले?

५) १९८९ ते १९९४ पर्यंतच्या कालखंडातील प्राध्यापकांची जी पदे भरण्यात आली आहे त्या पदावर निवड समिती नुसार भरती केल्यानंतर विद्यापीठाच्या अवैध मान्यता समितीने व संबंधीतांनी या सर्व पदांना ऑनवर्डस् किंवा ऑन प्रोबेशन असे शब्दप्रयोग अहवालात करुन मान्यता का देण्यात आली? ती देत असतांना जर हे प्राध्यापक पात्रता पूर्ण करीत नव्हते तर शासनाच्या निर्णयाचा संदर्भ ठेऊन "ऍज ए व्हेरी स्पेशल केस फॉर फाइव्ह सेशन" अशा स्वरुपाची मान्यता का दिली नाही? "

हे सारे लिखाण नेटग्रस्तांच्या कळवळ्यापोटी आहे की दरवर्षी नवे लोक लावण्याची संधी हुकली म्हणून पूतना मावशीच्या स्तनातून दुधाच्या रुपाने पाझरणाऱ्या विषासारखे आहे.

ज्या विषयातले आपल्याला काही माहीत नाही त्या विषयाबाबत तोंड उघडले नसते तर काही बिघडले असते काय? **आपल्या प्राध्यापकांना एकाच प्रतीमध्ये नोटीस द्यायची त्या प्रतीवर मिळाल्याबद्दल त्याची सही घ्यायची व प्रत त्यांना द्यायची नाही. असे त्यांना कुलगुरू/कुलपतींच्या कार्यालयात करता आले नाही. नाहीतर मग पुढे त्यांना आपली भूमिका बदलता आली असती. पण तशी सोय अजून त्यांना उपलब्ध झालेली नाही.**

४५. चारही बाजूने ही परीक्षा पास करण्यासाठी मुदत वाढवून

**ग्रामीण भागातील शिक्षकांविषयी प्रेमाचा उमाळा आलेली पूतनामावशी व तिच्या स्तनातील विषारी पान्हा दोन्हीचा असू द्या अल्पपरिचय**

(परिच्छेद १७ ते २५ व ४४ पहा)

द्या असा गलका होत असतांना विधान परिषद सभागृहामध्ये १७ मार्च १९९४ रोजी "पूर्वीच भरती झालेल्या शिक्षकांसाठी हे लागू होत नाही. हा मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही" अशी ठाम भूमिका मी स्वतः सर्व पुराव्यानिशी सभागृहात मांडली. नुटाच्या कार्यकारी मंडळाने याबाबतची भूमिका स्पष्ट करणारा जो ठराव आमसभेसमोर मांडला (विषय क्र. १५०) त्यामध्ये अतिशय मोजक्या व बिनचूक शब्दांमध्ये याबाबतची भूमिका ठोसपणे व्यक्त झालेली आहे तो ठराव पुढील प्रमाणे :-

"१९८९ ते १९९४ या काळामध्ये यथोचितरीत्या निवड समितीसमोर जाऊन निवड झालेल्या व सेवेमध्ये असलेल्या प्राध्यापकांवर पूर्वलक्षी प्रभावाने राष्ट्रीय पात्रता परीक्षा लादणे, केवळ अन्यायाचेच नसून उघडउघड बेकायदेशीरपणाचेसुद्धा आहे. ही गोष्ट महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्याबरोबर, १८ जानेवारी १९८९ रोजी झालेल्या समझोत्याचा उघडउघड भंग करणारी असून २७.२.८९ चा शासन निर्णय व त्यावर आधारित मा. कुलपतींच्या संमतीने करण्यात आलेले परिनियम यातील तरतुदींचा भंग करणारी आहे. **उक्त कालखंडामध्ये नियुक्त झालेल्या प्राध्यापकांची पदे भरतांना जाहिराती या विद्यापीठांनी मान्य करून दिलेल्या होत्या, निवड समिती कायद्याप्रमाणे रचित झालेली होती. त्यावर शासनाचे प्रतिनिधी नेमण्यात आलेले होते.** या नेमणुकांना विधिवत मान्यतासुद्धा प्राप्त झालेल्या आहेत. अशा रीतीने कायदेशीररीत्या झालेल्या या नेमणुकांवर व ते पद धारण करणाऱ्या शिक्षकांवर आता मागाहून 'नेट' लादण्याचा प्रयत्न मागे घेण्यात यावा अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करीत आहे.

राष्ट्रीय पात्रता परीक्षेला संघटनेचा विरोध नाही ही गोष्ट स्पष्टपणे नमूद करण्यात येत असून महाराष्ट्रात अशी परीक्षा घेण्याची कोणतीही तयारी महाराष्ट्र शासनाने आजपावेतो केलेली नाही १९ सप्टेबर १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये सुद्धा 'यथोचित रीत्या रचित झालेल्या निवड समित्या मार्फत ज्यांची अगोदर (१९.९.९१) पूर्वी निवड झाली त्यांना हे रेग्युलेशन लागू राहणार नाही' असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या२२ जुलै १९८८ च्या सूचनामध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये शिक्षक व उमेदवार असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे". हीच महाराष्ट्र प्राध्यापक संघाची भूमिका आहे.

४६. दिनांक १७ मार्च १९९४ रोजी विधान परिषद सभागृहामध्ये झालेली चर्चा शब्दशः काळजीपूर्वक वाचली (१९९४ चे नुटा बुलेटीन पृष्ठ २७ ते ३१) तर असे लक्षात येईल की १५-२० मिनिटांच्या चर्चेनंतर ध्वनियंत्रणेवर आपल्या विधान भवनातील कक्षात ही चर्चा ऐकत असलेले मा. मुख्यमंत्री हे स्वतः सभागृहात आले. त्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला. तर्कशुद्ध युक्तिवादाच्या आधारावर मा. मुख्यमंत्र्यांकडून सभागृहात पुढील आश्वासने मिळविण्यात संघटनेचा प्रतिनिधी या नात्याने आपल्याला यश मिळाले. सभागृहात मिळालेली आश्वासने पुढील प्रमाणे :-

"श्री. श.गो.पवार : अध्यक्ष महाराज, याच्यामध्ये आता बरेच प्रश्न निर्माण झालेले दिसतात. खरे म्हटले तर याचा कधी तरी विचार केला पाहिजे. कारण येथे सर्व शिक्षक प्रतिनिधी सन्माननीय सदस्य आहेत. आमच्या सर्वापेक्षा जी.आर.चे नंबर, इतर बारीक सारीक त्यांना माहीत आहे. पण या सर्व प्रश्नातून तात्पर्य असे दिसते की, पर्यायी व्यवस्था करण्याच्या संबंधीची जी काही जबाबदारी आहे ती अद्यापही पार पडलेली दिसत नाही. आणि ती नसताना त्यांच्या सेवा समाप्तीच्या संदर्भात संकट निर्माण झालेले आहे. राज्य शासनाची भूमिका स्वच्छ राहील की, ती पर्यायी व्यवस्था जोपर्यत होत नाही तोपर्यंत सेवा समाप्तीचा प्रश्न येणार नाही. यामध्ये परिवर्तन केले जाईल. हा एक भाग झाला. दुसरी गोष्ट अशी की मराठीची व्यवस्था केल्याशिवाय पर्यायी व्यवस्था होणार नाही हे या ठिकाणी सुचविले आहे. तशा प्रकारची तरतूद असेल तर ती केली जाईल आणि **तिसरी गोष्ट म्हणजे जे यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत तर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील.** फक्त तत्पूर्वी माझी एवढीच सूचना राहील की, सन्माननीय शिक्षण मंत्री, खात्याचे सचिव आणि आपल्या प्रतिनिधीबरोबर या आठवड्यामध्ये माझ्यासमक्ष बसून याची आम्ही शहानिशा करतो आणि ते म्हणतात तशा प्रकारची सुविधा असेल तर तशा प्रकारचा अनुकूल निर्णय घेतला जाईल."

## अतिरिक्त शिक्षकाबाबतची भूमिका

४७. वाणिज्य आणि विज्ञान शाखेमध्ये गेल्या काही वर्षात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होत असल्यामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या प्राध्यापकांच्या सेवेला संरक्षण देण्याचा प्रश्न गेले अनेक वर्षे शिक्षक संघटना, शासन व समाजासमोर आहे. २९ जुलै १९८६ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक संघाचा महाराष्ट्र शासनाशी जो समझोता झाला त्यामध्ये **"सेवेत संरक्षण देण्याच्या प्रश्नावर शिफारसी करण्यासाठी पाच सदस्य समिती नेमण्यात येईल"** असे ठरले होते. त्याप्रमाणे पुढे ही समिती नेमण्यात आली. मी स्वतः या समितीचा सभासद होतो. जानेवारी ८९ मध्ये या समितीने आपला अहवाल सादर केला. त्यानंतर जुलै १९९४ च्या अधिवेशनापर्यंत विधानपरिषद सभागृहामध्ये शासनाने या शिफारशी स्वीकाराव्या म्हणून आम्ही पाठपुरावा करीत होतो.

४८. तत्पूर्वीच्या काळात विद्यापीठ विधेयकाला ज्या दुरुस्त्या सुचविण्यात आल्या त्यामध्ये प्राध्यापक बी.टी.देशमुख यांनी खंड ३६ ला पुढील दुरुस्ती सुचविली होती :-

"Page 59 after line 43,following sub-section 36-A be added after section 36 namely :-

The management of any affiliated college, shall before proceeding to fill in vacancies of teachers in accordance with the prescribed procedure shall ascertain from the University whether there is any suitable person available on the list of surplus persons maintained by the University for absorption in other college and in the event of such person being available the Management shall appoint that person"

महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाने "list of amendments/suggestions from the members of the legislature and public for consideration of the joint committee on **L.A. BILL NO. XLVIII OF 1992-** the Maharashtra Universities Bill 1992." याचे दोन खंड छापून प्रकाशित केले होते. त्याच्या दुसऱ्या खंडातील पृष्ठ १४ वर (अनुक्रमांक १३) प्रा.बी.टी.देशमुख यांची उपरोक्त दुरुस्ती नमूद आहे. **दिनांक २५ फेब्रुवारी १९९४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रा.बी.टी.देशमुख याची ही दुरुस्ती संयुक्त समितीने विचारार्थ घेतली व संमत केली.** शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचासुद्धा समावेश यामध्ये करावा असेही ठरले.

४९. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ या कायद्याच्या कलम ७९(४) मध्ये अतिरिक्त शिक्षकांच्या सेवेला संरक्षण देणारी वर नमूद केलेली तरतूद समाविष्ट आहे. संयुक्त समितीने ही दुरुस्ती मान्य केली. नंतर व कायदा होण्यापूर्वीसुद्धा अतिरिक्त शिक्षकांना सेवासंरक्षण देणारे शासननिर्णय निर्गमित करण्यात आले होते (दिनांक २४ मार्च १९९४ रोजी) स्वाभाविकपणे विद्यापीठाने सर्व महाविद्यालयाना पत्र पाठवून तुमच्याकडे कोणी अतिरिक्त

**स्वतंत्र भारतात ६०० च्या वर संस्थाने विलीन झालीत पण अमरावती विद्यापीठामध्ये दारव्हा नावाचे एक लहानसे संस्थान शिल्लकच राहिले. तेथील त्यांच्या वेगळ्या कायद्यासह**

(परिच्छेद ४२ पहा)

शिक्षक असल्यास त्यांची नावे पाठवा असे कळविले. **आमच्या या नवोदित नेत्याने कोणताही मागचापुढचा विचार न करता या लहानशा महाविद्यालयातून किती शिक्षकांना अतिरिक्त ठरवावे? २०.७.९४ च्या पत्रान्वये १० प्राध्यापक अतिरिक्त होत असल्याचे त्यांनी विद्यापीठाला कळविले. त्यामध्ये २२ वर्षे सेवा झालेले उपप्राचार्यांचे नाव पहिल्या नंबरवर आहे.**

५०. शिक्षक संघटनांनी मेहनत करावयाची. १९८६ मधल्या आंदोलनात आश्वासन मिळवावयाचे. त्यानंतर पाचसदस्य समितीमध्ये दोन दोन वर्षे मेहनत करावयाची. सभागृहात अनेकदा प्रश्न उपस्थित करून शासनाची भूमिका पुढे पुढे नेणारी आश्वासने मिळवावयाची. विद्यापीठ विधेयकामध्ये दुरुस्त्या सुचवावयाच्या. संयुक्त चिकित्सा समितीमध्ये युक्तिवाद करावयाचे आणि अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण मिळविण्याची व्यवस्था विद्यापीठ कायद्यामध्ये अंतर्भूत करवून घ्यावयाची व शासन निर्णय निघाला रे निघाला की याची हुकुमशाही मानायला तयार नसलेल्या दहा प्राध्यापकांना (अतिरिक्त ठरविल्याचा) धक्का देऊन काढून द्यायला हे एका पायावर टपूनच बसलेले असणार "शिंके तुटले आणि बोक्याचे फावले" असाच प्रकार म्हणायला पाहिजे. २० जुलै १९९४ रोजी १० अतिरिक्त शिक्षकांची नावे कळवूनच हे थांबले नाहीत तर ६.९.१९९४ रोजी पुन्हा यांनी विद्यापीठाला रिमाईंडर पाठविले. शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी या सर्व घटनांक्रमावर लक्ष ठेऊन होते. या कपट कारस्थानाची बरीच कुप्रसिध्दी होईल असे या नवोदित नेत्याला कोणीतरी सांगितले. तेव्हा ६.९.९४ च्या विद्यापीठाला लिहिलेल्या २ पानी टंकलिखित पत्रावर **"सध्या शिक्षकांचे स्थानांतर करू नये. शिक्षकाचे हित लक्षात घेवून" असे एक वाक्य त्यांनी हस्ताक्षरात लिहिले.** शिक्षक हिताच्या या कळवळ्याबद्दल समस्त शिक्षकांनी यांचे जाहीर आभारच मानले पाहिजेत.

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
***NAGPUR BENCH : NAGPUR***

***Writ Petition No. 1696 of 1992***

***Petitioner:*** *Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha, through its Principal, Darwha, Tq. Darwha, Distt. Yavatmal.*

***Versus***

***Respondents : 1.*** *Amravati University, through its Registrar, Amravati.* ***2.*** *Director of Education, Maharashtra State, Pune-1.*

*Shri.V.G.Palshikar, Advocate for the Petitioner. S/Shri. B.P.Jaiswal and J.B.Jaiswal, Advocates for Respondent No. 1.*

*Coram*

**H.W.Dhabe & G.D.Patil, JJ**

*Dated : January 19, 1993.*

**Oral Judgement (Per H.W.Dhabe, J)**

Parties by counsel. Rule heard forthwith.

The Principal grievance of the petitioner college management is that the Grievance Committee constituted by the Amravati University has no power to stay its order directing pay-cut in the salary of one of the professors in the petitioner college. The learned counsel appearing for the Amravati University has urged before us that under the College Code Ordinance no 24 applicable to the Nagpur University vide its para 52, the Executive Council has power to constitute a Grievance Committee to go into the grievances of the teachers and Class III and Class IV non-teaching staff of the private Colleges. According to him, when the Amravati University Act, 1983 was enacted, as per Section 108 (2) of the said Act, all Statutes, Ordinances, Regulations, Rules and Orders made or issued under the Nagpur University Act, 1974 which were earlier applicable, were made applicable to the colleges affiliated to the Amravati University after the Amravati University Act. 1983 came into force, till they were modified or superseded by any Statute or Ordinances etc. passed by the Amravati University. He has urged before us that the college code Oridinance applicable under the Nagpur University Act is not superseded or modified and is still applicable to the affiliated colleges of the Amravati University. In view of the above contention raised on behalf of the Amravati University which is well founded, **the grievance of the petitioner that constitution of the Grievance Committee by the Executive Council of the Amravati University is illegal, is devoid of any merit.** However, it is necessary that the Grievance Committee constituted by the Amravati University should go into the matter and should consider the grievance of the aggrieved Professor within a reasonable time .

The instant writ petition, therefore, shall stand disposed of in terms of the following order :

The Grievance Committee appointed by the Amravati University is directed to go into the question of grievance of the professor concerned i.e. M.B. Mahatme in regard to cut in his salary and should decide the same within three months from the date of this order. Rule made absolute as above. No. costs.

## अभ्यासमंडळामध्ये मतदानाचा अधिकार

५१. अभ्यास मंडळाच्या निवडणूकीमध्ये विभाग प्रमुख या नात्याने प्रत्येक संलग्न महाविद्यालयातील प्रत्येक विषयाच्या विभागप्रमुखाला मतदार म्हणून समाविष्ट होण्यास नवीन विद्यापीठ कायद्यामध्ये कोणताहि प्रत्यवाय दिसून येत नाही व त्याप्रमाणे नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी काढलेल्या निदेशान्वये अशा प्रत्येक विभाग प्रमुखाचा समावेश करण्यात आलेला आहे. अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी काढलेल्या निदेशान्वये मात्र १० वर्षापेक्षा कमी अनुभव असलेल्या विभाग प्रमुखांना अशा समावेशापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. (मुंबई , पुणे विद्यापीठामध्ये सुध्दा अमरावती विद्यापीठासारखीच परिस्थिती असल्याचे समजले आहे) या बाबतचा सर्वंकष विचार करुन नुटाच्या कार्यकारी मंडळाने असा निर्णय घेतलेला आहे की "नागपूर विद्यापीठामध्ये जी स्थिती आहे तशीच सुविधा अमरावती विद्यापीठामध्ये उपलब्ध व्हावी यासाठी या निदेशांचे रुपांतर होत असतांना हा दोष दुरुस्त करण्यासाठी शिक्षक संघटनांशी बांधिलकी असणाऱ्या सर्व प्रतिनिधींनी सिनेटमध्ये प्रयत्न करावा असे ठरविण्यात येत आहे" महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या पातळीवर सुध्दा याबाबत समान भूमिका घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले आहे.

## नुटाची भूमिका

५२. शिक्षकांच्या व्यावसायिक हितासंबधीच्या मूळ सिध्दांतावर हल्ला करणारी भूमिका घेऊन शिक्षकांचीच संघटना बांधण्याचा प्रयत्न केला जात असताना डोळ्यावर कातडे ओढून नुटाने झोपा काढाव्या अशी अपेक्षा भ्रामक आहे. १९७४ चा कायदा झाल्यानंतर अनेकदा निवडणूका झाल्यात. १९७६ व १९८२ मध्ये नागपूर विद्यापीठांतर्गत निवडणूका झाल्यात अमरावती विद्यापीठ वेगळे झाल्यानंतर १९८९ मध्ये दोनहि विद्यापीठांतर्गत सिनेटच्या निवढणूकी झाल्या १९९५ मध्ये नागपूर विद्यापीठात सुध्दा निवडणूक झालेली आहे या सर्व वेळी नुटाने अधिकृतपणे भाग घेण्याचे कटाक्षाने टाळले होते व संघटनेचे पदाधिकारी "टिचर्स पॅनेल" तयार करुन या निवडणूकीमध्ये सहभागी होत असत.

५३. परीक्षेच्या कामाची सक्ती करणे, हे परीक्षेचे काम करण्यास तयार असलेले शिक्षक "बसवून ठेवण्या"साठी थांबले नाहीत म्हणून त्यांचा पगार कापणे, ४० तास/तासिकांचे वेळापत्रक लावून साडेसात तास महविद्यालयामध्ये महिला प्राध्यापकांना थांबून ठेवणे, हे नियमाला सोडून आहे म्हटले तर दर महिन्याला हजार रुपयाच्या वर पगार कापणे, २-४ महिने असा पगार कापल्यानंतर विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने पगार कपातीला नुसती स्थगिती दिली तर ती समितीच बेकायदेशीर आहे अशी बोंब मारणे, ही समिती रद्द व्हावी म्हणून कोर्टकचेरी करणे, परिनियम ५३ ची आवश्यकता नाही अशी भूमिका घेणे, नेटग्रस्तांच्या बाबतीत कोणत्याहि प्रकारची मुळातून माहिती नसतांना उथळ, चुकीची व नेटग्रस्त प्राध्यापकांच्या मुळ हिताच्या विरुध्द भूमिका घेणे, कार्यभार असतांना अनेक शिक्षकांना जाणूनबूजून अतिरक्त यादीवर पाठविणे, विद्यापीठाने सहकेंद्राधिकारी नेमण्यास नावे मागितली तर एकाचेही नाव न पाठविणे, इतक्या उपर कोणाला विद्यापीठाने नेमले तर त्याविरुध्द तक्रारी करणे, वरुन पुन्हा ग्रामीण शिक्षकांचा कळवळा दाखविणे, अभ्यासमंडळाच्या किंवा विद्याशाखेच्या बैठकीसाठी जाण्यास आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना परवानगी नाकारणे, इतक्या उपर कोणी गेल्यास "बिना पगारी" करुन आपल्या वेठबिगारीत शिक्षक आहे अशा थाटाचे वर्तन कागदोपत्री नमूद करणे. नोटीस देणे पण प्रत न देणे, नुसती सही करुन नोटीस मिळाल्याचे नमूद करण्याचा आग्रह धरणे, शिक्षकांनी दिलेल्या तक्रारीची पोच

देऊ नका अशी कार्यालयाला स्पष्ट सूचना देऊन ठेवल्यामुळे तिथल्या तिथे रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठविण्याची शिक्षकांवर पाळी येणे.या साऱ्या लाजिरवाण्या भूमिका तोंडातोंडी नाहीत तर शिक्षकांशी, विद्यापीठाशी, शासनाशी, मा. कुलपतींशी झालेल्या पत्रव्यवहारात व उच्च न्यायालयातील कगदपत्रांतून उत्तम रीतीने नोंदबध्द करुन ठेवणे व या सर्वांवर ताण म्हणजे आपल्या या सर्व विषारी भूमिकांना संघटित पाठबळ मिळविण्यासाठी ग्रामीण शिक्षकांना वेठीस धरणे हे मोठे धैर्याचेच काम म्हटले पाहिजे.

**५४ शिक्षकांचे व्यावसायिक जीवन मातीमोल करून टाकणारी स्थिती आणण्याच्या कामी इकडून दारव्ह्याचे संस्थानिक आले, तिकडून वाशिमचे संस्थानिक त्यांना मिळाले आणि या सर्व "नरेंद्र मंडळा"ने विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा गैरवापर करतो म्हटले तर १९७६ च्या पूर्वीची स्थिती येण्याला १९९६ हे वर्ष सुद्धा उजाडणार नाही. प्रॅक्टिकलची बॅच २० वरून १६ करा, पर्यवेक्षणाचे काम नसले तरी शिस्त टिकवण्यासाठी प्राध्यापकांना दिवसभर महाविद्यालयामध्ये बसवून ठेवा, परीक्षेचे काम करण्यास तयार असलेले शिक्षक शिस्त टिकावी म्हणून "बसवून ठेवण्या"साठी थांबले नाहीत म्हणून त्यांचा पगार कापा, ४० तास/तासिकांचे वेळापत्रक लावून विद्यापीठाकडे प्रत पाठवा, हे नियमाला सोडून आहे म्हटले तर दर महिन्याला हजार रुपयाच्या वर पगार कापा, विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीला पगार कपातीस स्थगिती देण्याचा तर अधिकार नाहीच पण ती समितीच बेकायदेशीर आहे तेव्हा तुम्ही हायकोर्टात जा, परिनियम ५३ ची आवश्यकता नाही त्यामुळे तो रद्द करण्यात येत आहे, नेटग्रस्तांच्या बाबतीत ऑनवर्ड अप्रुव्हल देण्यात विद्यापीठाची चुक झाली, ती आम्ही आता पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्त करीत आहोत, यापुढे त्यांना जन्मभर "एंज ए स्पेशल केस इयर टू इयर अप्रुव्हल आहे" असे समजावे, कार्यभार असतांना अनेक न आवडणाऱ्या शिक्षकांना अतिरक्त यादीवर पाठविण्याची प्राचार्यांना मुभा असेल, अभ्यासमंडळाच्या किंवा विद्याशाखेच्या बैठकीसाठी जाण्यास प्राचार्यांची परवानगी घेतल्याशिवाय कोणीहि हजर राहू नये, इतक्या उपर कोणी गेल्यास "बिना पगारी" समजल्या जाईल, प्राचार्य नोटीस देतील पण प्रत मात्र कोणीहि मागू नये, नोटीसचा मजकूर लिहून सुध्दा घेवू नये, नुसती सही करुन नोटीस मिळाल्याचे नमूद करणे शिक्षकावर बंधन कारक राहील. शिक्षकांनी दिलेल्या तक्रारीची पोच कार्यालयातील कोणीहि देता कामा नये. हे आणि यासारखे हुकूम विद्यापीठाच्या गॅझेटमध्ये रोज प्रकाशित होत जातील.**

५५. आमच्या या नवोदित नेत्याच्या चरित्र आणि कर्तृत्वाची माहिती सर्व शिक्षकांपर्यंत पोचली की त्या जहाजातून अनेक उमेदवार भराभर उड्या टाकतील. काहीजण जहाजावरचा बोर्ड बदला म्हणतील. या मंचच्या ऐवजी तो मंच म्हणतील. दोन तीन मंच एकत्र करून थोडेसे यांचे काळे तोंड उजळ करु म्हणतील. एकूणच 'मंच' या नावाला आमच्या या नवोदित नेत्याच्या कर्तृत्वामुळे आलेला काळीमा लक्षात घेता कोणताच मंच न ठेवता NUTA च्या ऐवजी AUTA करू अशीहि एखादी "आयडीया" हे मंचरलेले लोक काढतील. जहाजावरून उड्या टाकणारे आपण त्या गावचेच नव्हतो असे सांगतील. आमचा त्यांचा काही संबध नाही असेहि सांगतील.

- नेतृत्वाचे कुंकू कपाळी लावले की त्या कुंकवाच्या मागे लपलेल्या बऱ्या वाईट कर्तृत्वापासून दूर पळता येत नाही हे सांगा त्यांना

- हेहि सांगा त्यांना की जन्मभर शिक्षकांसाठी लढणाऱ्या संघटनेने निवडणूक लढविणे ही वेगळी गोष्ट असते आणि निवडणूक लढविण्यासाठी संघटना जन्मास घालणे ही एक दुर्घटनाच असते. कारण ते बाळंतपण निट झाले नाही तर पातक लागते गर्भपाताचे.

- हे विचारा त्यांना की ग्रामिण भागातील या नवोदित नेत्यांच्या विचाराला साथ देणारे शहरात सुध्दा कोणकोण आहेत?

- हेहि विचारा त्यांना की नुटाच्या अध्यक्षांच्या पॅनेलवर ७ वर्षापूर्वी उभे राहून निवडून आलेले पण नंतर पॅनेल सोडून गेलेले हे शहरातील त्यांचे आजचे साथीदार उमेदवार सार्वजनिक हितबुध्दीने कार्यरत होते की निरनिराळ्या 'खुर्च्या' मिळविण्याच्या त्यांच्या धावपळीचा तो एक भाग होता?

५६. नुटाला अमचा विरोध नाही प्रा. बी.टी.देशमुख यांच्याविषयी आम्हाला आदर आहे असे सभेतून व वृत्तपत्रातून सतत सांगणाऱ्या या नवोदित नेत्यांच्या कारवाया शिक्षक चळवळीच्या तिरस्काराचाच विषय असू शकतात. हे जाहिरपणे सांगीतले पाहिजे.

५७. हेही नुटाचेच आहेत. तेही नुटाचेच आहेत. अशी परिस्थिती असेल तेव्हा संघटनेला या कामात लक्ष देण्याची गरज राहत नाही. आतापर्यंत तशी गरज नव्हती परंतु शिक्षक म्हणून व्यावसायिक जीवनाच्या ज्या मूलभूत तत्त्वांचे संरक्षण करण्यासाठी संघटनेच्या नेतृत्त्वाखाली अनेकांनी अनेक वर्षे श्रम केलेत, जिवापाड मेहनत केली त्या बाबी उखडून टाकण्याचा संघटित प्रयत्न निवडणुकीच्या निमित्ताने कोणी करीत असेल तर त्या प्रयत्नांना संघटना म्हणून संघटित उत्तर देणे एवढाच पर्याय शिल्लक राहतो. पूर्ण विचारांती नुटाच्या कार्यकारी मंडळाने हे आवाहन स्वीकारले असून सिनेटच्या निवडणूकीमध्ये शिक्षक मतदार संघाच्या २० जागांसाठी अधिकृतपणे उमेदवार उभे करण्याचे ठरविले आहे. अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या चारहि जिल्ह्यांच्या जिल्हा नुटा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या संयुक्त बैठकीमध्ये नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या या निर्णयाची सर्व शक्तीनिशी अम्मलबजावणी करण्याचा निर्णय झालेला आहे.

**५८. विनंती : (अ) शिक्षक मतदार संघाच्या २० जागासाठी अधिकृत पणे नुटाच्या पॅनेलवर उभे असलेल्या सर्व उमेदवारांना पसंतीचे क्रमांक आपण द्यावे. अशी विनंती करण्यात येत आहे.**

**(ब) शिक्षक मतदार संघातून ग्रामीण शिक्षकांच्या नावावर आमच्या नवोदित नेत्याने सुरु केलेल्या कारवाया लक्षात घेता त्यांच्या पॅनेलवर असलेल्या किंवा पॅनेलवर नसलेल्या पण त्यांच्या या कारवायामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी झालेल्या किंवा असलेल्या कोणत्याहि उमेदवाराला पसंतीचा कोणताहि क्रम देऊ नये अशी विनंती आहे.**

**(क) नुटाने पदवीधर मतदार संघामध्ये ज्या उमेदवारांना पाठींबा दिला आहे त्या सर्वांना पसंतीचे क्रम द्यावे व शिक्षकांनी इतरही पदवीधरांना तशी विनंती करावी**

**- बी.टी.देशमुख**

## धूर इतकाही ओकू नये

आकाश काळवंडून जाईल
धूर इतकाही ओकू नये
रोखले पाहिजे-

सारेच नासवू पाहणाऱ्या
कुरूप सुकलेल्या नजरांना
आरसे दाखवले पाहिजेत

सर्वग्रासी सत्तापिपासूंचे
जावईपण जपणाऱ्या गुरांचे
शेतात मोकाट सुटणे .....
थांबवले पाहिजे

मेहनतीने मशागत करणाऱ्यांच्या
जिवाला घोर अन्
सत्कार्याची माती करण्याचा
यांचा सैतानी उद्दाम इरादा-
वजाबाकी होणे जरुर आहे

मौन दुबळेपणा मानले जाईल
इतके सहनशील व्हावे काय?
बरे ...... वाईट
आपलेच निर्मिलेले आहे असे मानून
पण झाडून ..... झटकून पाहिले पाहिजे
मौन सोडले पाहिजे.

**- डॉ.शरद कळणावत**

*अमरावती विद्यापीठ सिनेट निवडणूक*

## सभांच्या आयोजनाबाबत सूचना

अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी १९९५ रोजी होऊ घातल्या आहेत. शिक्षक मतदार संघातून होणाऱ्या २० जागासाठी नुटाने आपले उमेदवार अधिकृतपणे उभे केले असून पदवीधर मतदार संघाच्या १० जागासाठी होणाऱ्या निवडणुकांमध्ये काही उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. शिक्षक व पदवीधर उमेदवाराचे या निवडणुकीकरिता जे पॅनेल तयार करण्यांत आले, त्या पॅनेल मधील उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी प्रचार सभांचे आयोजन करण्यांत आलेले आहे. या **सभांचे तपशील देणारा तक्ता** याच बुलेटीनमध्ये प्रसिद्ध केला आहे.

**२. सभा असलेल्या शहरी/गांवी या सभेची नोटीस काढणे व सभेचे आयोजन करण्याची जबाबदारी नुटाच्या शहर शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी/स्थानिक संघटकांनी/जिल्हा पदाधिकाऱ्यांनी/ त्या जिल्ह्यातील उमेदवारांनी पार पाडावी अशी अपेक्षा आहे व तशी त्यांना विनंती आहे.**

३. सभेची नोटीस कशी असावी याचा नमुना मुद्दाम सोबत जोडलेला आहे. सभेच्या नोटीसच्या जादा प्रती आपल्या पातळीवर पुरेशा तयार करवून घ्याव्या तसे करतांना त्यावर सभेचे ठिकाण, तारीख व वेळ कृपया नमूद करावी व सर्व संबंधीतांना ती नोटीस मिळेल याची काळजी घ्यावी अशी विनंती आहे. उक्त सभेला सर्व महाविद्यालयीन शिक्षकांनी उपस्थित राहावे अशी अपेक्षा आहे.

**५. दिवसांच्या अभावी जिल्ह्यात ज्या ठिकाणी सभांचे आयोजन या दौऱ्यात करता आले नाही त्या ठिकाणी (त्या जिल्ह्यातील या दौऱ्याचे दिवस टाळून) नुटाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सभांचे आयोजन करावे अशी विनंती आहे.**

**नमुना**

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

*अमरावती विद्यापीठ सिनेट निवडणूक*

महाविद्यालयीन प्राध्यापकांची सभा

### सभेची सूचना

अमरावती विद्यापीठ सिनेटच्या निवडणुका सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी १९९७ रोजी होऊ घातल्या आहेत. शिक्षक मतदार संघातून होणाऱ्या २० जागासाठी नुटाने आपले उमेदवार अधिकृतपणे उभे केले असून पदवीधर मतदार संघाच्या १० जागासाठी होणाऱ्या निवडणुकांमध्ये काही उमेदवारांना पाठिंबा दिला आहे.

नुटाने स्वीकारलेल्या धोरणांस पाठिंबा देण्यास वचनबद्ध असलेल्या शिक्षक व पदवीधरांचे अमरावती विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीकरिता जे पॅनेल तयार करण्यांत आले, त्या पॅनेल मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी आपल्या येथे महाविद्यालयीन प्राध्यापकांची सभा आयोजीत केली आहे.

या सभेला नुटाने अध्यक्ष व संघटनेचे अन्य पदाधिकारी हजर राहतील. सभेमध्ये प्रामुख्याने नुटाच्या उमेदवारांच्या प्रचाराच्या व यशाच्या दृष्टीने चर्चा होईल.

तरी आपण कृपया सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

सभेचा दिवस व तारीख :-

सभेची वेळ :-

सभेचे स्थळ :- विनित

**सभांचे तपशील देणारा तक्ता**

### AMRAVATI DISTRICT

**Thursday the 2nd February 1995**

1. **CHANDUR (RLY) :** Ashok Mahavidyalaya. 8.00 A.M.
2. **DHAMANGAON :** Adarsh Mahavidyalaya. 10.30 A.M.
3. **MOZRI & TIOSA :** Y.D.V.D.College Teosa. 1.30 P.M.
4. **WARUD :** Mahatma Phule Mahavidyalaya. 4.30 P.M.
5. **MORSHI :** Bharatiya Mahavidyalaya. 6.30 P.M.

**Friday 3rd February, 1995**

6. **CHANDUR BAZAR :** G.S.Tompe Mahavidyalaya. 9.00 A.M.
7. **ACHALPUR & PARATWADA :** Jagdamba Mahavidyalaya. 11.30 A.M.
8. **ANJANGAON SURJI :** Smt. Radhadevi Sarda College. 3.00 P.M.
9. **DARYAPUR :** J.D.Patil College. 6.00 P.M.

### AKOLA DISTRICT

**Saturday, the 4th February 1995**

1. **MURTIZAPUR :** Gadge Maharaj Mahavidayalaya. 8.00 A.M.
2. **KARANJA :** K.N.College. 10.00 A.M.
3. **MANGRULPIR :** V.N.College. 12.00 Noon
4. **WASHIM :** R.A.College 4.00 P.M.
5. **PATUR :** Dr.Sinha College 7.00 P.M.

**Sunday, 5th February 1995**

6. **AKOLA :** R.L.T.Sci.College 1.00 P.M.
7. **TELHARA :** Dr.Gopalrao Khedkar College 3.30 P.M.
8. **AKOT :** Shri. Shivaji College. 5.30 P.M.

### BULDHANA DISTRICT

**Tuesday 7th February 1995**

1. **SHEGAON :** G.B.Murarka Arts & Com. College. 9.00 A.M.
2. **KHAMGAON :** G.S.College. 11.00 A.M.
3. **MALKAPUR :** Janata Arts & Comm. College. 4.00 P.M.
4. **BULDHANA :** Jijamata M.V. 6.30 P.M.

**Wednesday 8th February 1995**

6. **CHIKHALI :** Shivaji Arts & Commerce College. 7.30 A.M.
7. **MEHKAR :** M.E.S.Arts & Commerce College. 11.00 A.M.
8. **LONAR :** B.B.Arts and Commerce College. 2.30 P.M.

### YAVATMAL DISTRICT

**10th February 1995**

1. **NER PARSOPANT :** Shivaji High School. 8.00 A.M.
2. **DIGRAS :** Dinbai High School. 11.00 A.M.
3. **PUSAD :** Lokahit Vidyalaya. 4.00 P.M.

**11th February 1995**

4. **YAVATMAL :** Ane Mahila Mahavidyalaya. 8.00 A.M.
5. **GHATANJI :** G.Arts College. 10.30 A.M.
6. **PANDHARKAWADA:**B.D.P. Mahavidyalaya. 1.00 P.M.
7. **WANI :**Lokamanya Tilak Mahavidyalaya. 4.00 P.M.

# TEACHERS' PANEL

***(All the names of the candidates are shown in the alphabetical order as are arranged in the University list.)***

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

## 1) Faculty of Arts (including Fine Arts)

Andhare. R. S.
Bansod. M.M.
Bhele. B.M.
Chittaranjan. R.
Hazare. V. T.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या पांच उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 2) Faculty of Science

Chaudhari. S. V.
Divekar. S.N.
Khan. S. M.
Kharat. U. U.
Kulkarni. K.M.
Mankar. A. R.
Rane. V. B.
Ratnaparkhi. D. D.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या आठ उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, ६, ७, ८ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 3) Faculty of Medicine

Somawanshi. P. R.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

## 4) Faculty of Commerce

Burghate. A. V.
Deshmukh. S. N.
Somani. D. D.
Tiwari. S. A.
Vyas. N. H.
Yenorkar. V. W.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या सहा उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४, ५, ६ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 5) Faculty of Education

Chavan. B. M.
Dhere. D.G.
Somvanshi. A. G.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या तीन उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 6) Faculty of Engg and Tech

Londhe. R. S.
Patil. S. K.
Soni. S. N.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या तीन उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 7) Faculty of Social Sciences

Ambhore. S. N.
Deshmukh. B. T.
Kulat. S. V.
Sangle. S. T.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या चार उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३, ४ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

## 8) Faculty of Home Science

Mane. (Smt) A. G.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या उमेदवाराला पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

## 9) Faculty of Ayurvedic Medicine

Khadatkar. P. S.
Mohod. E. M.
Pimparkar. K. M.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या तीन उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर उमेदवारांना २, ३ असे पसंतीचे क्रमांक द्यावेत.

# TEACHERS' PANEL

## 1) Faculty of Arts

ANDHARE. R. S.
BANSOD. M.M.
BHELE. B.M.
CHITTARANJAN. R.
HAZARE. V. T.

## 2) Faculty of Science

CHAUDHARI. S. V.
DIVEKAR. S.N.
KHAN. S. M.
KHARAT. U. U.
KULKARNI. K.M.
MANKAR. A. R.
RANE. V. B.
RATNAPARKHI. D. D.

## 3) Faculty of Medicine

SOMWANSHI. P. R.

## 4) Faculty of Commerce

BURGHATE. A. V.
DESHMUKH. S. N.
SOMANI. D. D.
TIWARI. S. A.
VYAS. N. H.
YENORKAR. V. W.

## 5) Faculty of Education

CHAVAN. B. M.
DHERE. D.G.
SOMAVANSHI. A. G.

## 6) Engg. and Tech.

LONDHE. R. S.
PATIL. S. K.
SONI. S. N.

## 7) Faculty of Social Sciences

AMBHORE. S. N.
DESHMUKH. B. T.
KULAT. S. V.
SANGLE. S. T.

## 8) Faculty of Home Science

MANE. (SMT) A. G.

## 9) Ayurvedic Medicine

KHADATKAR. P. S.
MOHOD. E. M.
PIMPARKAR. K. M.

**सूचना :** (१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सगळ्या उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून हा कागद मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.

## GRADUATES' PANEL

***(All the names of the candidates are shown in the alphabetical order as are arranged in the University list.)***

### (Seven General/Open)

BAHEKAR. A. A.
BAROTE. R. S.
BOKEY. A. M.
DAWARE. P. R.
DESHMUKH. M. K.
DESHMUKH. S. S.
HADKE. S. K.
JAGTAP. R. K.
JUNGHARE. P. P.
KAKAD. A. B.
PATIL. D. A.
PUROHIT. J. B.
SONAR. D. C.
TARAL. S. N.
UMALE. N. P.
YAWALIKAR. P. V.

**RESERVED SEATS**

**Scheduled Caste (One Member)**

PINJARKAR. R. T.
WASNIK. S. P.

**Scheduled Tribes (One Member)**

PARATE. D. P.

**Other Backward Caste (One Member)**

DESHMUKH. A. K.
SADAR. S. B.

**सूचना :** (१) वरील टीचर्स व ग्रॅज्युएट पॅनेलच्या यादीतील सगळ्या उमेदवारांना पसंतीक्रम द्यावे ही विनंती. कोणाला कोणता क्रम द्यावा यासबंधी मतदाराने घरीच निर्णय घेऊन तसे क्रम वरील यादीवर लिहून घ्यावे. म्हणजे मतदानास वेळ लागणार नाही. (२) आधीच पसंतीक्रम लिहून हा कागद मतदान कक्षात नेता येईल. (३) पसंतीक्रम आधीच लिहून नेल्यास प्रत्यक्ष मतदान करणे सोईचे होईल व वेळेची सुध्दा बचत होईल.

*आमचा जाहीरनामा*

## पदवीधर व शिक्षक मतदारांना विनंती

(१) विद्यार्थ्यांचे हित हा सबंध विद्यापीठाच्या कामाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. ही केवळ शाब्दिक पोपटपंची असता कामा नये. “आधी केले मग सांगितले” असे या शब्दांचे स्वरूप असले पाहिजे. १९९४ च्या विद्यापीठ कायद्याच्या आठव्या प्रकरणामध्ये विद्यार्थी हिताच्या अनेक तरतुदी आल्या आहेत. प्रवेश गुणवत्तेवर व नियमानुसार झाले पाहिजेत, प्रवेश नियमाला सोडून झाल्यास चटकन न्याय मिळण्यासाठी न्यायाधिकरणाची तरतूद, विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे संपूर्ण वेळापत्रक त्याला ३० ऑक्टोबरपूर्वी दिले पाहिजे, ठरवून दिलेल्या वेळी निकाल जाहीर केले पाहिजे या व अशा सारख्या तरतुदी महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठ कायद्यामध्ये यापूर्वी कधीही समाविष्ट नव्हत्या. १९९२ च्या मूळ विधेयकामध्ये (सन १९९२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८) सुद्धा या तरतुदी नव्हत्या. उभय सभागृहाच्या संयुक्त समितीने हे आठवे प्रकरण पूर्णपणे नव्याने या कायद्यात समाविष्ट केले. या समितीचा एक सदस्य या नात्याने माझ्या या कामातील सहभागाबद्दल मला आनंद वाटतो. या समितीची कार्यवृत्ते पहिल्यास माझ्या या कामातील प्रभावी सहभागाचा परिचय सहज होवू शकेल.

(२) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या व्यावसायीक जीवनाला चाटून जाणाऱ्या अनेक तरतुदी १९९४ च्या कायद्याच्या सातव्या प्रकरणामध्ये समाविष्ट आहेत. याबाबत समितीचा सदस्य या नात्याने मी उपसलेली मेहनत सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ठाऊक आहे त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

(३) केवळ कायद्यात चांगल्या तरतुदी असून भागत नाही तर त्याची उत्तम अंमलबजावणी होण्यासाठी विविध प्राधिकरणावर उत्तम व्यक्ती निवडून जाणे आवश्यक असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये त्या त्या संस्थामध्ये काम करणाऱ्या माणसांच्या दर्जावर त्या संस्थांचे भवितव्य अवलंबून असते. उत्तम दर्जाची माणसे विद्यापीठामध्ये विविध पदावर निवडून आली तर त्या माणसांची व त्याबरोबरच त्या पदांची शान वाढते. कमी दर्जाची माणसे निवडून आली तर त्या प्रमाणात त्या त्या पदांचे अवमूल्यन होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक सेवाशर्तीबाबत काम करीत असताना विद्यापीठाच्या या एकंदर व्यवस्थेमध्ये विद्यार्थी हा खरा केंद्रबिंदू राहील ही आमची सिनेटमध्ये काम करतानाची श्रद्धा असेल.

(४) जात, धर्म किंवा राजकीय पक्ष, विद्यापीठातील गटबाजी यांचा विचार व पर्वा न करता शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाची जपणूक करणे ही भूमिका असेल.

(५) विद्यापीठाचा कारभार चालत असतांना तो व्यक्तीच्या लहरीनुसार न चालता विधिनियम, परिनियम, विनियम, नियम यांच्या आधारेच चालला पाहिजे यावर काटेकोर लक्ष ठेवले जाईल.

(६) १९९४ च्या विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनुसार निरनिराळ्या क्षेत्रातील पदवीधरांचे १० प्रतिनिधी सिनेटमध्ये येणार आहेत. या जागासाठी आमच्या कांही सहकारी मित्रांचे “पदविधर पॅनेल” आपणासमोर आहे. त्यापैकी आपणास पसंत असलेल्या उमेदवाराला आपण क्रमांक १ द्यावा व इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत. अशी विनंती आहे. - ***बी.टी.देशमुख***

## GRADUATES' PANEL

### (Seven General/Open)

**मतदान करण्याबाबत आमची विनंती**

Bahekar. A. A.
Barote. R. S.
Bokey. A. M.
Daware. P. R.
Deshmukh. M. K.
Deshmukh. S. S.
Hadke. S. K.
Jagtap. R. K.
Junghare. P. P.
Kakad. A. B.
Patil. D. A.
Purohit. J. B.
Sonar. D. C.
Taral. S. N.
Umale. N. P.
Yawalikar. P. V.

**पसंतीक्रम :** मतदारांनी या उमेदवारांपैकी पसंत असलेल्या उमेदवाराला १ क्रमांक द्यावा व त्यानंतर आपल्या पसंतीप्रमाणे इतर सर्व उमेदवारांना पसंतीचे पुढचे क्रमांक द्यावेत.

**RESERVED SEATS**

**Scheduled Caste (One Member)**

Pinjarkar. R. T.
Wasnik. S. P.

पसंतीप्रमाणे १ व २ क्रमांक द्या.

**Scheduled Tribes (One Member)**

Parate. D. P.

पसंतीचा १ क्रमांक द्यावा.

**Other Backward Caste (One Member)**

Deshmukh. A. K.
Sadar. S. B.

पसंतीप्रमाणे १ व २ क्रमांक द्या.

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr. Sharad Kalnawat, Tilakwadi, Yeotmal-444 001. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at :NUTA Office, (for NUTA Bulletin ) Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Someshwar Printing Press, Satidham Market Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Date of Posting : **1. 2. 1995**
Name of the Posting office : R.M.S. Amravati.

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road,
Amravati-444 601.